दिनांक: १२.१०.२०२६
स्थळ: रायगड

सही/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

निवडक


सुभाष हातोळे यांची शहर उपाध्यक्षपदी नियुक्ती

नेरळ : शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते सुभाष हातोळे यांची पक्षाचे माथेरान शहर उपाध्यक्ष पदावर नियुक्ती झाली आहे. शहर अध्यक्ष उमेश कदम यांनी ही नियुक्ती केली असून, पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरेश खैरे यांच्या आदेशाने ही नियुक्ती झाली आहे.

कर्जत-खालापूर तालुक्याचे माजी आमदार सुमंतराव राऊत यांचे माथेरान हे तालुक्यातील निवासस्थान होते.त्यामुळे माथेरानमध्ये शेतकरी कामगार पक्षाची चांगली नाळ जुळली होती आणि



माथेरानमध्ये असंख्य कार्यकर्ते पक्षाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होते. माथेरान नगरपरिषदेमध्ये अनेक पदांवर शेकापचे नगरसेवक विराजमान झाले आहेत. मात्र, काळाच्या ओघात माथेरानमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते कमी झाल्याने पक्ष आपले अस्तित्व राखू शकला नाही. मात्र, पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी पक्षाची कमान कायम ठेवत पक्षाचे ध्येयधोरणे जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शेकापची ध्येयधोरणे राबविणारे कार्यकर्ते माथेरान शहरात असून, शहर चिटणीस उमेश कदम यांनी नवीन फळी निर्माण करण्यास घेतली आहे. पक्षाच्या बांधणीत आपल्या जुन्या कार्यकर्त्यांना संधी देण्याचा निर्णय पक्ष नेतृत्वाने घेतला आहे. त्यामुळे जिल्हाध्यक्ष सुरेश खैरे यांच्या आदेशाने जूने कार्यकर्ते सुभाष हातोळे यांच्यावर पक्षाने शहर उपाध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे.सुभाष हातोळे यांच्या निवडीने जुने कार्यकर्ते समाधानी झाले असून, पक्षाला उभारी देण्यासाठी पक्षाचा प्रयत्न असल्याचे शहर चिटणीस उमेश कदम यांनी स्पष्ट केले आहे.



लोखंडी जाळ्यांमुळे अपघाताचा धोका

पाताळगंगा : ग्रुप ग्रामपंचायत कुंभिवलीतील भूमिगत गटाराचे काम गेल्या आठ महिन्यांपासून रखडल्याने स्थानिक ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अर्जुन म्हामुणकर यांच्या घरापासून अंकुश पाटील यांच्या घरापर्यंत गटारासाठी खोदकाम करण्यात आले आहे. मात्र, काम अपूर्ण अवस्थेत असल्याने परिसरातील नागरिकांची गैरसोय होत असून, लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. या कामादरम्यान गटारावर लोखंडी जाळ्या टाकण्यात आल्या आहेत. मात्र, काही ठिकाणी गटार उघड्या अवस्थेत असल्याने लहान मुलांचे किरकोळ अपघात झाल्याचे पालकांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी संबंधित यंत्रणेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. स्थानिक विकास क्षेत्र योजनेअंतर्गत हे काम करण्यात येत असल्याचे समजते. मात्र, आठ महिने उलटूनही गटार आणि रस्त्याचे काम पूर्ण झालेले नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.



पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसंवर्धनाचा उपक्रम

रसायनी : आपटा येथील कोरळ आदिवासी वाडीत गेल्या अनेक वर्षांपासून भेडसावणाऱ्या पाणीटंचाईवर उपाययोजना करण्यासाठी टाटा वोल्टास इंडियाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. कंपनीच्या सेवा सप्ताहानिमित्त शुक्रवारी ४५ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदान करून कोरळ आदिवासी वाडीत वनराई बंधारा बांधला. या उपक्रमामुळे पावसाचे पाणी अडवून जमिनीत पाण्याचे पुनर्भरण होण्यास मदत होणार असून, स्थानिक नागरिकांना उन्हाळ्यातील पाणीटंचाईपासून काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वोल्टास इंडियाच्या सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत (सीएसआर) गेल्या दोन वर्षांपासून ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून कोरळ आदिवासी वाडीत जलसंवर्धन आणि पाणलोट क्षेत्र विकासाची विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. आदिवासी वाडीपासून सुमारे १ किलोमीटर अंतरावर असलेल्या पिण्याच्या पाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विहिरीची दुरुस्ती, अनेक वर्षांपासून कोरड्या पडलेल्या कुपनलिकांची दुरुस्ती आणि त्यांच्याभोवती पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती अशी कामेही करण्यात आली आहेत.

चिरनेर गावात आदिशक्तीचा जागर

। चिरनेर । प्रतिनिधी ।

नवरात्र उत्सवाला अश्विन शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच रविवार, दि.११ ऑक्टोबरसपासून प्रारंभ झाला आहे. यावेळी घराघरातून आणि सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळातून कुलदैवतेची व दुर्गा मातेची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. दरम्यान, उरण तालुक्यातील चिरनेर गावात अभिनव सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ, सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ चिरनेर रांजणपाडा चिंचपाडा, दुर्गामाता नवरात्र उत्सव मंडळ चिरनेर कातळपाडा, सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ रेवसकर गल्ली कातळपाडा, सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ कुंभारपाडा या आणि परिसरातील अनेक प्रतिष्ठित नवरात्र उत्सव मंडळांच्या माध्यमातून यंदाही या उत्सवाचे आकर्षण दिसून येत आहे. त्यामुळे आदिशक्तीच्या



भक्तांमध्ये आनंदाचे व चैतन्याचे वातावरण आहे.

या दिवसांत चिरनेर परिसरात नऊ दिवस आदिशक्तीचा जागर होणार असल्यामुळे परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. तसेच, गरबा, दांडिया नृत्य फॅन्सी ड्रेस, फनी गेम्स, होम विधी, फॅशन शो, पारंपारिक नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम, हळदी कुंकू, होम मिनिस्टर, मंगळागौर, भजन, व्याख्यान, अंबेचा गोंधळ, सत्यनारायणाची पूजा, महाआरती, ज्येष्ठ भजन मंडळीचा अभिनव सन्मान, महाप्रसाद व भव्य मिरवणूक या सर्व कार्यक्रमांचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक व तरुणाई सहभागी होणार असल्याने मंडळांकडून आकर्षक व प्रशस्त मंडप उभारले गेले आहेत. दरम्यान भव्य मंडप, आकर्षक विद्युत रोषणाई व सजावट आणि दुर्गामातेची प्रतिष्ठापना यामुळे भाविकांमध्ये आनंदाचे व चैतन्याचे वातावरण दिसून येत आहे. अशी माहिती सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.



● अलिबाग तालुक्यातील धोलपाडा येथे नवरात्रोत्सवानिमित्त देवी विराजमान झाली असून, उपाध्यक्ष सुधीर पाटील यांच्या हस्ते माऊलीची पुजा पार पडली.

उरण तालुक्यात भक्तिभावाने प्रतिष्ठापना

। उरण । प्रतिनिधी ।

नवरात्रोत्सव हा सण केवळ धार्मिक विधी नसून, तो वाईटावर चांगल्याच्या विजयाचे आणि आदिशक्तीच्या भक्तीचे एक अनोखे प्रतीक आहे. अशा नवरात्रोत्सवाचे उरण तालुक्यात जंगी स्वागत करण्यात आले असून, ठिकठिकाणी दुर्गामातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना विधी पूर्वक पूजा अर्चा करून करण्यात आली आहे.

नवरात्रोत्सव हा तरुणाई बरोबर आबालवृद्धांना एक प्रकारे पर्वणी असते. अशा शारदीय नवरात्र उत्सवात पहिल्या दिवशी घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये घटस्थापना (कलश स्थापना) केली जाते. तांब्याच्या किंवा मातीच्या कलशात पाणी भरून, त्यावर विड्याची किंवा आंब्याची पाने आणि नारळ ठेवून देवीचे आवाहन केले जाते. कलशाखालील मातीत नऊ प्रकारची धान्ये (नवधान्य) पेरावी लागतात. नऊ दिवस अखंड जळणारा नंदादीप देवीच्या निरंतर उपस्थितीची साक्ष देतो. नवरात्रोत्सवाचे खरे रंग संध्याकाळनंतर पाहायला मिळतात. गुजरातची परंपरा असलेला गरबा आणि दांडिया रास आज संपूर्ण महाराष्ट्रात आणि जगभरात मोठ्या उत्साहाने खेळला जातो. रंगीबेरंगी पारंपारिक पोषाख परिधान करून, ढोल आणि संगीताच्या तालावर रात्रभर चालणारा हा नृत्योत्सव म्हणजे तरुणाईसाठी आनंदाची पर्वणीच असते. महाराष्ट्रात नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करण्याची आधुनिक परंपराही महिला वर्गात अत्यंत लोकप्रिय आहे. त्यामुळे हा उत्सव समाजाला एकत्र आणण्याचे काम करतो. तसेच, यादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भजने, कीर्तने आणि रास गरबा यांचे आयोजन केले जाते. अष्टमीला महालक्ष्मी पूजन आणि नवमीला होणारे होम-हवन उत्सवाची भव्यता अधिक वाढवतात. अशा नवरात्रोत्सवाचे उरण तालुक्यात जंगी स्वागत करण्यात आले असून, ठिकठिकाणी दुर्गामातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना विधी पूर्वक पूजा अर्चा करून करण्यात आली आहे.

मुरूडमध्ये ७१ देवींची घटस्थापना

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीत यंदा ७१ देवींची घटस्थापना झाली असून, सर्वत्र नवरात्रोत्सवाची लगबग सुरू झाली आहे. मुरूड शहरातील जुनीपेठ येथील शिवशक्ती क्रीडा मंडळाच्या देवीचे आगमन झाले असून, मंडळाच्यावतीने गेल्या ३५ वर्षांपासून नवरात्रोत्सवाची परंपरा जपली जात आहे.

शिवशक्ती क्रीडा मंडळाची देवी खारअंबोली येथील संदीप मोकल यांच्या मंगलमूर्ती गणपती कारखान्यातून आणण्यात आली आहे. मंडळाच्या देवीच्या पूजेचा मान यंदा सिद्धेश कोलवणकर व त्यांच्या पत्नी अर्पणा कोलवणकर यांना मिळाला आहे. ही पूजा पुरोहित आशिष जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विधिवत करण्यात आली. गेल्या ३५ वर्षांपासून मंडळाकडून



नवरात्रोत्सव उत्साहात साजरा केला जात आहे. यंदाही देवीच्या आगमनामुळे जुनीपेठ परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, नवरात्रोत्सवासाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

नवरात्रीनिमित्त मोफत थायरॉईड तपासणी

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

नवरात्रीनिमित्त महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देत जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था पनवेल आणि दीपक क्लिनिकल लॅबोरेटरी यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी नऊ दिवस मोफत थायरॉईड तपासणी उपक्रम राबविण्यात येत आहे. दि.११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान पनवेल मधील उपजिल्हा रुग्णालयासमोरील दीपक क्लिनिकल लॅबोरेटरी येथे ही तपासणी केली जाणार आहे. महिलांमध्ये थायरॉईडसंबंधी आजारांविषयी जनजागृती करणे आणि वेळेत तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. वजनात अचानक बदल होणे, सतत थकवा जाणवणे, केस गळणे तसेच मासिक पाळी अनियमित होणे यांसारखी लक्षणे जाणवल्यास महिलांनी आरोग्याकडे दुर्लक्ष न करता आवश्यक तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ''महिलांचे आरोग्य हा निरोगी कुटुंबाचा पाया आहे.

कर्जत तालुक्यातील आई वरणाई माता

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील कर्जत-खोपोली रस्त्यावरील डोंगराच्या बाजूला वर्णे, नांगुर्ले, तिघर ही तीन गावे असून, या गावातील ग्रामस्थांची ग्रामदेवता म्हणून तेथील वरणाई माता सर्वांसाठी श्रद्धास्थान बनली आहे. सध्या शारदीय नवरात्रौत्सव असल्याने ठिकठिकाणी देवींच्या मंदिरामध्ये दर्शनासाठी गर्दी होत आहे. या वर्षी देखील उस्फूर्तपणे भक्त ठिकठिकाणी दर्शनासाठी जात आहेत.

बऱ्याच गावांच्या परिसरात गावदेवीची मंदिरे पाहायला मिळतात. त्या-त्या गावाची वेगवेगळी अख्यायिका स्थानिक सांगत असतात. तशीच कर्जत-पळसदरी



मार्गे खोपोली रस्त्यालगत असलेल्या वर्णे, नांगूर्ले, तिघर या गावाच्या डोंगराच्या पायथ्याशी निसर्गाच्या सानिध्यात गावदेवी वरणाई मातेच प्राचीन मंदिर आहे. देवीची मूर्ती खुप प्राचीन काळातील असून, मंदिर परिसरात पांडवकालीन खुणा आढळतात. आजूबाजूला झाडांची गर्दी आणि लाल मातीच्या पायवाटेने गेल्यावर वरणाई देवीचे मंदिर नजरेस पडते. मंदिराच्या मागील बाजूस डोंगर कुशीत पांडवकालीन गुहा आहेत. तेथील भागात पिण्यायोग्य पाण्यासाठी जमिनीच्या अंतर्गत खोदून पाण्याचे टाके दगडामध्ये दिसतात. त्यामध्ये बारमाही पाणी आजही पाहायला मिळते. वरणाई देवी जागृत देवी असल्याने परिसरातील भक्तगण येथे दर्शनासाठी गर्दी करत आहेत. परिसरातील माहेरवाशिणी सुद्धा नवरात्रीत आवर्जून दर्शनासाठी येत असतात.

देवीच्या जयघोषात वरसगावमध्ये घटस्थापना

। कोलाड । प्रतिनिधी ।

आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर दि.११ ऑक्टोबर रोजी हन्सप्रीत हाऊसिंग सोसायटीमध्ये शारदीय नवरात्रोत्सवाचा अत्यंत उत्साहात प्रारंभ झाला. ''उदे गं अंबे उदे'' आणि ''जय माता दी''च्या जयघोषात सोसायटीच्या मध्यवर्ती प्रांगणात विधिवत घटस्थापना करण्यात आली. या वर्षी नवरात्रौत्सवाचे विशेष औचित्य साधून संपूर्ण सोसायटी परिसराला आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांनी सजवण्यात आले आहे. रविविरी पहाटे शुभ मुहूर्तावर सोसायटीमधील ज्येष्ठ नागरिक आणि उत्सव कमिटी



अध्यक्ष प्रवीण ढमाले यांच्या हस्ते मुख्य पूजेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात पारंपरिक वेशभूषेत बालकांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वच रहिवासी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पुरोहितांच्या मंत्रोच्चारात शास्त्रोक्त पद्धतीने घट बसवून अखंड दीप प्रज्वलित करण्यात आला.

सोसायटीच्या कमिटीने दिलेल्या माहितीनुसार, पुढील नऊ दिवस रोज संध्याकाळी आरती, गरबा-दांडिया, लहान मुलांसाठी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, तसेच महिलांसाठी आणि लहान मुलांसाठी अशा विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच सामाजिक भान जपण्यासाठी विविध कार्यक्रम आहेत. घटस्थापनेच्या या पहिल्याच दिवशी संपूर्ण सोसायटीमध्ये भक्तीचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व रहिवाशांनी एकत्र येत उत्सवाचा आनंद घेतला.

तळा तालुक्यातील ५३ ठिकाणी प्रतिष्ठापना

। तळा । प्रतिनिधी ।

तळा तालुक्यात शारदीय नवरात्रोत्सवाला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे. दि.११ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेच्या मुहूर्तावर तालुक्यात एकूण ५३ ठिकाणी देवीच्या मूर्तींची विधिवत स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये ४७ सार्वजनिक मंडळे आणि ६ खासगी घरगुती मूर्तींचा समावेश आहे. याशिवाय तालुक्यात ७ ठिकाणी पारंपरिक घटस्थापना आणि २ ठिकाणी देवीच्या प्रतिमेची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण तालुका सध्या देवीमय वातावरणाने भारावून गेला आहे. या उत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये



यासाठी तळा पोलीस सज्ज झाले आहेत. तळा पोलीस ठाण्याकडून पुढील दहा दिवसांसाठी प्रत्येक मंडपावर पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गर्दीवर नियंत्रण, वाहतूक व्यवस्था आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस गस्त वाढवण्यात आली आहे.

म्हसळ्यात नवरात्रोत्सवाची उत्साहात सुरुवात

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा शहरासह तालुक्यात शारदीय नवरात्रोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली असून, विविध नवरात्रोत्सव मंडळांच्यावतीने धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देवीच्या आराधनेबरोबरच महिलांना, लहान मुलांना आणि युवकांना सहभागी करून घेणाऱ्या विविध उपक्रमांमुळे शहरात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले आहे.

म्हसळा शहरातील श्रीराम नवरात्र उत्सव मंडळ, कुंभार समाज नवरात्र उत्सव मंडळ, आदिवासी वाडी नवरात्र मंडळ आणि बेलदार समाज मंडळ यांच्यावतीने नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. या मंडळांनी उत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे नियोजन केले आहे. नवरात्रोत्सवादरम्यान



● (छायाचित्रः उदय कळस)

महिलांच्या भजनाचे आयोजन करण्यात येत असून, पारंपरिक भोंडला नृत्याच्या माध्यमातून महिलांना आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविण्याची संधी मिळत आहे. लहान मुलांसाठी फनी गेम्स आयोजित करण्यात आले आहेत, त्यांच्या सहभागामुळे उत्सवात आनंदाची भर पडणार आहे.

तसेच, दररोज होणारी देवीची महाआरती हे उत्सवाचे विशेष आकर्षण ठरत आहे. याशिवाय भाविकांसाठी लकी ड्रॉ, धार्मिक विधी म्हणून होम तसेच रात्रीच्या वेळी रंगणारा गरबा यामुळे नवरात्रोत्सवाला विशेष रंगत येणार आहे. या उत्सवातून नऊ दिवस धार्मिक श्रद्धा, पारंपरिक लोककला आणि मनोरंजन यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळणार आहे. महिला, युवक, बालके आणि नागरिकांचा सहभाग जास्त प्रमाणात वाढत असून, नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा आणि बंधुभाव जपण्याचा प्रयत्न मंडळाकडून केला जात आहे.

रोह्यात नवरात्रोत्सवाला उत्साहात प्रारंभ | **ब्रिटिश काळापासून पोलीस मानवंदनेची परंपरा**

श्री धावीर महाराज देवघटी बसले

। रोहा । प्रतिनिधी ।

ब्रिटिश काळापासून पोलीस मानवंदना देण्याची परंपरा देशातील दोन देवस्थानां लाभलेली आहे. त्यापैकी एक असलेले रायगडवासीयांचे श्रद्धास्थान आणि रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज रविवारी (दि.११) विधिवत देवघटी बसले आणि महाराजांच्या नवरात्रोत्सवाला मोठ्या उत्सात प्रारंभ झाला.

रोहा शहराच्या पश्चिमेला हनुमान टेकडीच्या पायथ्याशी श्री धावीर महाराजांचे भव्य मंदिर आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात श्री धावीर महाराज, कालिका माता, बहिरीबुवा, वाघबाप्पा आणि मागे तीनवीरा यांची स्थाने आहेत. तर मंदिराबाहेर महाराजांचे अंगरक्षक चेडा देवाचे स्थान आहे. रविवारी श्री धावीर महाराजांना विधिवत देवघटी बसविण्याच्या सोहळ्यासाठी मंदिरात रोहेकरांनी मोठी गर्दी केली होती. देवस्थानचे पुजारी वरणकर यांनी देवस्थानचे विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडो धावीरभक्तांच्या उपस्थितीत महाराजांकडे पारंपरिक पद्धतीने गाऱ्हाणे मांडले. गावातील सर्व भक्तांनी श्रद्धेने नवरात्रोत्सवाचे आयोजन केले असून, उत्सवादरम्यान



घडणाऱ्या चुका गोड मानून घेऊन गावाचे सर्व संकटांपासून रक्षण करावे, अशी प्रार्थना त्यांनी केली.

त्यानंतर महाराजांवर अक्षतांची उधळण करण्यात आली. गोंधळ्यांच्या आरत्या, विविध वाद्यांचा गजर आणि घंटानादाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. मंगलमय वातावरणात ग्रामदैवताची महाआरती संपन्न झाली आणि नवरात्रोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली. यावेळी आमदार अनिकेत तटकरे, रोहा नगराध्यक्षा वनश्री शेडगे, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष कुमार पाशिलकर, सरचिटणीस दर्शन कदम, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, विश्वस्त नितिन परब, सुभाष राजे, समीर सकपाळ, विजयराव मोरे, आनंद कुलकर्णी, प्रकाश पवार, महेश सरदार, संदीप सरफळे, राजेंद्र जैन, आप्पा देशमुख, अमित उकडे, निलेश शिर्के, राजेश काफरे, अजित मोरे, रवींद्र चाळके, परशुराम चव्हाण, राजन पाटील, सूर्यकांत कोलाटकर, शैलेश कोळी, प्रकाश पाटणकर, वैभव साळुंखे यांच्यासह विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी, उत्सव समितीचे सदस्य आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुजारी वरणकरांनी मांडले गाऱ्हाणे

''हे धावीर महाराजा, समस्त रोहावासीय ग्रामस्थांनी श्रद्धेने आणि पारंपरिक पद्धतीने तुझा नवरात्रोत्सव मांडला आहे. या उत्सवात आमच्या हातून चांगली सेवा होईल; काही चुका झाल्यास त्या गोड मानून घे. महाराजा, तुझ्या गावाला सर्व संकटांपासून दूर ठेव आणि समस्त रोहावासीयांवर तुझी कृपादृष्टी कायम राहू दे,'' असे भावपूर्ण गाऱ्हाणे यावेळी पुजारी वरणकर यांनी श्री धावीर महाराजांकडे मांडले.

आज मोफत हाडांच्या विकारांची तपासणी

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

हाडांचे विकार, संधिवात आणि सांधेदुखीने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी कळंबोलीतील एमजीएम रुग्णालयात सोमवारी (दि.१२) मोफत निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जागतिक संधिवात दिनानिमित्त आयोजित या शिबिरात विविध हाडांच्या विकारांची तपासणी करून रुग्णांना योग्य उपचारांसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

कळंबोली सेक्टर ४-ई येथील एमजीएम रुग्णालयात सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत हे शिबीर होईल. यामध्ये सांधेदुखी, गुडघेदुखी, कंबरदुखी, मणक्यांचे विकार, खांदेदुखी, हाडांचे फ्रॅक्चर, संधिवात तसेच लहान मुलांमधील हाडांच्या विकारांची तपासणी करण्यात येणार आहे. याशिवाय रुग्णांना केसपेपर आणि हाडांची घनता तपासण्यासाठी बीएमडी (बोन मिनरल डेन्सिटी) तपासणीची सुविधाही मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. तपासणीनंतर ज्या रुग्णांना पुढील उपचारांची आवश्यकता असेल, त्यांना आयुष्मान भारत तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या नियमानुसार मोफत उपचारांची सुविधा मिळू शकते. त्यामुळे पनवेल तालुक्यातील गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्णालय प्रशासनाने केले आहे.

घाबरलेले सरकार

दिल्लीत शनिवारी जे घडले ते अभूतपूर्व होते. चार महिन्यांपूर्वी स्थापन झालेल्या एका तरुण पोरांच्या संघटनेने आंदोलन करण्याचा इशारा दिला म्हणून चाळीस हजार पोलिस राजधानीच्या रस्त्यारस्त्यांवर उतरवण्यात आले. देशभरातून दिल्लीकडे जाणाऱ्या शेकडो रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या. दिल्ली शहराची मुख्य वाहतूक वाहिनी असलेली मेट्रो सेवा बंद करण्यात आली. शुक्रवारी या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली तेव्हा माशीला मारायला हातोडा कशाला वापरताय असा सवाल न्यायाधीशांनी सरकारला केला. पण शेवटी सरकारने आपला हट्ट सोडला नाही. जणू काही परकीय सैन्यच चालून येणार आहे अशा रीतीने त्यांनी दिल्लीची बांधबंदिस्ती केली. आकाशातून ड्रोन विमाने घिरट्या घालत होती. परिस्थिती आणखी थोडी बिकट वाटली असती तर कदाचित हवाई दलाची लढाऊ विमाने आणायलाही नरेंद्र मोदी व अमित शहा यांच्या सरकारने कमी केले नसते. रस्त्यातून जाणाऱ्या प्रत्येक नागरिकाची संशयित म्हणूनच तपासणी केली जात होती. त्यांना हुसकले जात होते. पत्रकारांना दंडुके मारण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांनी मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला तर त्यांनाही ताब्यात घेण्यात आले. अभिजित दीपके वगैरेंना तर विमानातून उतरण्यापूर्वीच अटक करण्यात आली. निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी राजीनामा द्यावा ही आंदोलकांची मुख्य मागणी आहे. निवडणूक आयोगाने मतदार तपासणीच्या नावाखाली जो काही अंदाधुंद कारभार चालवला आहे त्यामुळे सर्वत्र संताप आहे. आपल्याकडे खुद्द अलिबागमध्ये ४२ हजार मतदारांना नोटिसा आल्या आहेत. यावरून देशभरात काय स्थिती असेल याचा अंदाज येईल. या नोटिसा आलेल्यांना जन्मतारखेचे किंवा अन्य काही पुरावे द्यायला सांगितले जात आहे. काही जणांना त्यांच्या आईवडिलांचे जन्मतारखेचे दाखले घेऊन यायला सांगितले जात आहे. ज्यांची नावे २०१९,२१,२४ च्या यादीत आहेत अशा मतदारांना संशयित ठरवणे आणि यादीतून काढून टाकण्याची नोटीस देणे हाच भयंकर प्रकार आहे. तुम्ही या देशाचे नागरिकच नाही असे सरकारने म्हणण्यासारखे आहे. याविरुध्दच्या संतापाला दिल्लीतील आंदोलनाने वाट करून दिली आहे. दिल्लीतील आंदोलनात समजा २५ किंवा ५० हजार लोक आले असते तरी त्यामागे देशभरातील ५० कोटी नागरिकांचा संताप दडलेला आहे हे मोदी सरकारला पक्के ठाऊक आहे. त्यामुळेच त्यांची ही अभूतपूर्व पोलिसी दडपशाही चालू आहे.

लंका जळून जाईल

भाजपचे नेते आणि भाजपच्या गोठ्यात बांधलेला मिडिया यांनी कालचे आंदोलन कसे मोडून काढण्यात आले म्हणून मोठा आनंद प्रदर्शित केला. जनतेशी या लोकांचा संपर्क किती तुटला आहे याचा हा पुरावा आहे. एक म्हणजे एका साध्या आंदोलनासाठी किती प्रचंड प्रमाणात फौजफाटा उतरवण्यात आला याचे दर्शन टीव्हीच्या पडद्यावरून आणि सोशल मिडियातून देशभरातील जनतेला काल दिवसभर झाले. त्यावरून हे सरकार किती घाबरलेले आहे ते जनतेला कळून चुकले. दिल्लीमध्येच नव्हे तर मुंबई, पुणे व दुसऱ्या शहरांमध्येही शनिवारी आंदोलने झाली व तिथेही पोलिसांच्या दडपशाहीचा हाच नमुना दिसला. वास्तविक कॉकरोच जनता पार्टीने कोणत्याही प्रकारच्या हिंसेची भाषा केलेली नाही हे सर्व देश पुरेपूर जाणतो. सरकारने मिडियातल्या गुलामांकरवी कितीही प्रचार केला तरी सीजेपीने कायम गांधी आणि आंबेडकर यांची नावे घेऊन घटनात्मक रीत्या व शांततापूर्ण रीतीनेच निषेध नोंदवलेला आहे हे जनतेसमोर आहे. जुलै महिन्यातही संसदेवर निघालेल्या मोर्चाने हिंसक प्रकार केल्याचा एकही व्हिडिओ सरकारला आजतागायत दाखवता आलेला नाही. याउलट पोलिसांनी केलेल्या बेरहम लाठीमाराची दृश्ये सर्वांनी पाहिलेली आहेत. या स्थितीत दहा ऑक्टोबरची निदर्शने शांततापूर्ण रीतीनेच झाली असती हे अगदी पोलिसांसह सर्वांनाच ठाऊक आहे. या आंदोलनात भाग घेण्यासाठी देशभरातून युवक दिल्लीला गेले होते. त्यांच्या मागे त्यांची लक्षावधी कुटुंबे आहेत. या कुटुंबातल्या लोकांनी गेल्या निवडणुकांमध्ये बहुतांशी भाजपलाच मतदान केलेले आहे. याच कुटुंबामध्ये संतापाची ही वात पेटली आहे आणि ज्ञानेश कुमारच नव्हे तर आता खुद्द मोदींच्याच राजीनाम्याची मागणी होऊ लागली आहे हे स्पष्ट दिसते आहे. आंदोलन मोडून काढले किंवा या आंदोलनामागे परकीय शक्तींचा हात आहे असे भाजपवाले वरवर कितीही म्हणू द्यात. पण जनतारुपी मारुतीच्या शेपटाला लागलेली आग आपल्या लंकेला भस्मसात करू शकेल याची जाणीव त्यांना झालेली आहे.

वणवा आणखी भडकेल

राहुल गांधी किंवा काँग्रेस पक्ष कालच्या आंदोलनात का नव्हते वगैरे सवाल भाजपने केले आहेत. असे करून आपण या विरोधकांमध्ये लावालावी करू शकू असे त्याला वाटते. पण आता विरोधक कितीही पक्षांमध्ये वा गटांमध्ये वाटले गेले असले तरी मोदी-शहांचे हे सरकार नको ही भावना बळकट होत आहे. या सरकारविरुध्द कधीही इतक्या प्रमाणात असा तिरस्कार निर्माण झाला नव्हता. काँग्रेस किंवा बाकीचे विरोधी पक्ष या वातावरणाचा फायदा कसा घेतात हा डावपेचांचा व त्यांच्या क्षमतेचा प्रश्न आहे. त्यात काय होते हे येत्या काही काळात दिसेलच. पण भाजप नावाचा जो अभेद्य गड होता त्याच्या चिरफळ्या उडालेल्या आहेत हे पुन्हा एकवार दिसले. जुलै महिन्यातल्या झुरळांच्या आंदोलनामुळे धर्मेंद्र प्रधानांना राजीनामा द्यावा लागला होता. आता ज्ञानेश कुमार हे घटनात्मक पदावर असल्याने त्यांना हटवणे हे सोपे नाही. आजवर त्यांचा उद्दामपणा पाहता ते सहजासहजी बाजूला हटतील असे दिसत नाही. पण ते गेले नाहीत तरीही आंदोलकांच्या भीतीने सरकारने जी आदळआपट केली तीच त्यांच्या पराभवाची साक्ष आहे. वास्तविक या प्रकरणात सरकारने आंदोलकांशी बोलणे हा एक सोपा पर्याय होता. निवडणूक आयोगाने विरोधी पक्षांशी संवाद करणे हा दुसरा पर्याय होता. पण त्या दोन्हीवर फुली मारण्यात आली. विरोधकांशी बोलणे हे मोदी सरकारला कमीपणाचे वाटते. तर आयुक्त अहंकाराने इतके फुगलेले आहेत की ते विरोधी पक्षांच्या नेत्यांना भेटायलाही तयार नाहीत. त्यासाठी ते अमुक प्रोटोकॉल आणि तमुक नियम अशा सबबी सांगत आहेत. ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याच्या मागणीपर्यंत वेळ आलेली असताना आयोगाने स्वतःहून विरोधी पक्षीयांची बैठक बोलवायला हवी होती. आयोगाविरुध्दचे आरोप केवळ एका व्यक्तीचा मुद्दा नसून पूर्ण लोकशाहीबद्दलच संशय निर्माण करणारा आहे. भारताची संविधानिक चौकटच यातून उखडली जाऊ शकते. हा विश्वास गमावला जाऊ नये ही जबाबदारी सरकार, न्यायालय, आयोग अशा सर्व संस्थांची आहे. दुर्दैवाने गेल्या काही काळात या संस्थांचा व्यवहार संशयास्पद वाटावा असा झाला आहे. येत्या आठवड्यात मतदार पुनरीक्षण अर्थात एसआयआरबाबत पुन्हा सुनावणी होणार आहे. त्यावेळी आयोगाचा बेकादायशीरपणा उघड होईलच. त्यावेळी या तिन्ही संस्थांची कसोटी लागेल. थोडक्यात शनिवारी आणि रविवारी आंदोलन दडपले असले तरी असंतोष संपलेला नाही. उलट त्याचा वणवा आणखी भडकत जाणार आहे.

विचार

पुतीन यांचा विजय, लोकशाही मात्र संशयात

रशियाच्या संसदीय निवडणुकीत व्लादिमीर पुतीन यांच्या 'युनायटेड रशिया' पक्षाने ४५० पैकी ३५५ जागा जिंकत ५७.८३ टक्के मते मिळवली. मात्र या निकालाकडे केवळ सत्ताधारी पक्षाचा विजय म्हणून न पाहता विरोधकांवरील कारवाई, डिजिटल मतदान, माध्यम ंवरील निर्बंध, युक्रेन युद्धामुळे निर्माण झालेले आर्थिक ताण आणि तरुणांच्या सैन्यभरतीचा वाढता दबाव या मुद्दयांच्या पार्श्वभूमीवर पहावे लागेल.



आरिफ शेख

रशियामध्ये निवडणूक झाली आणि अपेक्षेप्रमाणे व्लादिमीर पुतीन यांच्या नेतृत्वाखालील सत्ताव्यवस्थेने पुन्हा एकदा ताकद दाखवून दिली. 'युनायटेड रशिया'ला ४५० सदस्यांच्या 'स्टेट ड्यूमा'मध्ये ३५५ जागा मिळाल्या. २०१६ मध्ये मिळवलेल्या ३४३ जागांचा विक्रमही पक्षाने मागे टाकला. २०२१ मध्ये पक्षाकडे ३२४ जागा होत्या. या वेळी पक्षाला सुमारे ५७.८३ टक्के मते मिळाली. त्यामुळे घटनात्मक बहुमत पुन्हा सत्ताधारी पक्षाकडे आहे. आकडेवारीच्या दृष्टीने हा मोठा विजय आहे; मात्र लोकशाहीच्या दृष्टीने या निकालाचे मूल्यमापन करताना आणखी काही प्रश्न विचारावे लागतात. कारण निवडणूक म्हणजे केवळ मतांची बेरीज नव्हे; मतदारांना कोणते पर्याय उपलब्ध होते, विरोधकांना किती मोकळेपणाने प्रचार करता आला, माध्यमांना आपली भूमिका नीट निभावता आली का, मतदानाची प्रक्रिया किती पारदर्शक होती, यावरही निवडणुकीची लोकशाही गुणवत्ता ठरते. रशियातील या वेळची निवडणूक २०२२ मध्ये युक्रेनवर पूर्ण प्रमाणात लष्करी कारवाई सुरू झाल्यानंतरची पहिली संसदीय निवडणूक होती. त्यामुळे पुतीन यांनी या निवडणुकीकडे देशातील 'राष्ट्रीय एकते'ची परीक्षा म्हणून पाहिले; परंतु त्याच वेळी युद्धविरोधी राजकीय शक्तींची उपस्थिती अत्यंत मर्यादित होती. 'याब्लोको' हा युद्धाला स्पष्टपणे विरोध करणारा नोंदणीकृत पक्ष राष्ट्रीय पातळीवर निवडणुकीच्या शर्यतीतून बाहेर पडला. त्याचे अनेक उमेदवारही मैदानात उतरू शकले नाहीत. काही युद्धविरोधी नेते तुरुंगात आहेत, तर काहींना देशाबाहेर जावे लागले आहे. ही परिस्थिती रशियातील विरोधकांच्या अवस्थेचे चित्र स्पष्ट करते.

ताज्या निवडणुकीमध्ये 'कम्युनिस्ट पार्टी', 'एलडीपीआर', 'न्यू पीपल' आणि 'अ जस्ट रशिया' यासारखे पक्ष अस्तित्वात आहेत; परंतु मोठ्या राष्ट्रीय प्रश्नांवर, विशेषतः युक्रेन युद्धाच्या संदर्भात त्यांची भूमिका 'क्रेमलिन'च्या धोरणांपासून फारशी वेगळी नाही. त्यामुळे संसदेत विरोधकांचे अस्तित्व आहे; मात्र सत्तेला मूलभूत राजकीय आव्हान देणारा विरोधक किती आहे, हा वेगळा प्रश्न आहे. यामुळे रशियन निवडणूक व्यवस्थेतील 'सिस्टिमिक ऑपोझिशन' हा शब्द महत्त्वाचा ठरतो. विरोधक संसदेत असू शकतात, भाषणे करू शकतात, मतदारांमध्ये जाऊ शकतात; पण सत्तेच्या मूलभूत निर्णयांवर प्रभावी अंकुश निर्माण करण्याची त्यांची क्षमता मर्यादित असल्याचे या निवडणुकीत पुन्हा दिसले. परिणामी, संसद ही सत्तेवर नियंत्रण ठेवणारी संस्था आहे, की सत्तेच्या निर्णयांना वैधानिक रूप देणारी संस्था, असा प्रश्न उपस्थित होतो. या निवडणुकीतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे डिजिटल मतदान. रशियाने अनेक भागांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली. मतदानाचा वेग आणि सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने डिजिटल मतदान आकर्षक वाटते. मोठ्या भौगोलिक विस्ताराच्या देशात, दूरवर राहणाऱ्या मतदारांसाठी किंवा प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाणे कठीण असलेल्या नागरिकांसाठी ही पद्धत सोयीचीही ठरू शकते; मात्र डिजिटल मतदानाचा प्रश्न केवळ तंत्रज्ञानाचा नाही; तो विश्वासाचा आहे. मतपत्रिकेऐवजी स्क्रीनवर मत दिले जाते म्हणून प्रक्रिया आपोआप अधिक पारदर्शक ठरत नाही. उलट, मतदानाची नोंद कशी होते, मतदाराची ओळख आणि मताची गुप्तता कशी जपली जाते, निकालाची स्वतंत्र पडताळणी कशी होते, याचे उत्तर अधिक स्पष्ट असणे आवश्यक आहे.

रशियातील डिजिटल मतदानावर सरकारचे टीकाकार प्रश्न उपस्थित करत आहेत. विशेषतः सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवणारी स्वतंत्र निरीक्षण यंत्रणा मर्यादित असल्याने तंत्रज्ञानावरील विश्वासाचा प्रश्न अधिक गंभीर बनतो. याच निवडणुकीदरम्यान रशियन केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात 'डीडीओएस' सायबर हल्ले झाल्याचा दावा केला. आयोगाच्या म्हणण्यानुसार दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान व्यवस्थेलाही हल्ल्यांचे लक्ष्य करण्यात आले; मात्र कोणत्या देशाने किंवा कोणत्या पक्षाने हे हल्ले केले, याचा स्वतंत्र पुरावा अधिकाऱ्यांनी सादर केलेला नाही. त्यामुळे सरकारी दावे आणि स्वतंत्रपणे सिद्ध झालेली माहिती याम ध्ये फरक ठेवणे गरजेचे आहे. रशियातील राजकीय वातावरणात गेल्या काही वर्षांमध्ये मोठा बदल झाला आहे. युक्रेन युद्धानंतर सरकारने युद्धविरोधी वक्तव्यांवर, स्वतंत्र माध्यमांवर आणि नागरी समाजाच्या संघटनांवर कठोर निर्बंध आणले आहेत. मतदार मतदान केंद्रापर्यंत पोहोचतो; पण त्याच्यासमोर असलेले राजकीय पर्याय किती मुक्त आहेत, हा प्रश्न उरतो. निवडणुकीपूर्वीच एखाद्या पक्षाला मैदानाबाहेर काढले गेले, एखाद्या उमेदवारावर कायदेशीर कारवाई झाली किंवा युद्धाविरोधातील मत व्यक्त करणे धोकादायक झाले, तर मतपेटीत नोंदवलेले मत हे लोकशाहीतील पूर्ण राजकीय निवडीचे प्रतिबिंब कितपत मानायचे? याचा अर्थ प्रत्येक रशियन नागरिक पुतीन यांच्या विरोधात आहेत, असा नाही. उलट, काही नागरिकांना सध्याची व्यवस्था स्थैर्य देणारी वाटते, तर काहींना युद्ध सुरू ठेवण्याची भूमिका मान्य आहे.

निवडणुकीनंतर 'रॉयटर्स'ने घेतलेल्या नागरिकांच्या प्रतिक्रियांमध्ये काहींनी शांतता आणि आर्थिक स्थैर्याची इच्छा व्यक्त केली, तर काहींनी सध्याच्या परिस्थितीबद्दल समाधान व्यक्त केले. यातून एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो, तो म्हणजे पुतीन यांच्या राजवटीबद्दलची नाराजी असेल, तर ती नेहमी उघड राजकीय विरोधाच्या रूपातच दिसेल असे नाही. युद्ध संपावे, इंधनाच्या किमती वाढू नयेत, रोजगार आणि उत्पन्न स्थिर रहावे, मुलांना युद्धात जावे लागू नये, एवढीच इच्छा असणारा नागरिक सत्ताविरोधी घोषणाबाजी करेलच असे नाही. भीती, राजकीय पर्यायांचा अभाव आणि दैनंदिन जगण्याच्या चिंता यामुळे नाराजी अनेकदा 'मूक' राहू शकते. युद्धाची सर्वात मोठी परीक्षा रणांगणावर असते; पण त्याची किंमत अखेरीस अर्थव्यवस्थेलाही चुकवावी लागते. रशिया तेल आणि वायूचा मोठा उत्पादक असला, तरी युद्धखर्च, निर्बंध, संरक्षण खर्च आणि उत्पादन-साखळीवरील परिणाम यामुळे अर्थसंकल्पावर दबाव वाढत आहे. रशियाचा २०२६ मधील अर्थसंकल्पीय तुटीचा अंदाज आता जीडीपीच्या तीन टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. हा सरकारच्या मूळ १.६ टक्के लक्ष्यापेक्षा मोठा आहे. २०२५ मध्ये ही तूट २.६ टक्के होती. संरक्षण खर्च आणि युद्धाशी संबंधित खर्च वाढणे हे त्यामागील प्रमुख कारणांपैकी एक असल्याचे रशियाचे अर्थमंत्री अँटोन सिलुआनोव्ह यांनी सांगितले आहे. ऊर्जाक्षेत्रालाही युद्धाचा फटका बसत आहे. युक्रेनकडून रशियातील तेलशुद्धीकरण प्रकल्पांवर होणारे ड्रोन हल्ले आणि इतर कारणांमुळे देशातील इंधनपुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे.

ऑगस्ट महिन्यामध्ये मॉस्कोसह अनेक भागांमध्ये पेट्रोलच्या विक्रीवर मर्यादा घालण्याची वेळ आली होती. इतकेच नव्हे, तर २०२६ मधील रशियाचे तेल उत्पादन २००९ नंतरच्या सर्वात कमी पातळीवर जाण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. युद्धाचा परिणाम, निर्बंध आणि रिफायनरीवरील हल्ले यामुळे तेल आणि इंधनक्षेत्रावर दीर्घकालीन दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. याचा अर्थ रशियाची अर्थव्यवस्था कोसळली आहे, असा दावा करता येणार नाही. रशियन अर्थव्यवस्था अजूनही मोठ्या संसाधनांवर आणि ऊर्जा निर्यातीवर आधारित आहे; मात्र युद्ध जितके लांबते, तितकी अर्थव्यवस्थेची संसाधने नागरी विकासाऐवजी संरक्षण क्षेत्राकडे वळतात. रस्ते, आरोग्य, शिक्षण, सामाजिक सुरक्षा आणि तरुणांसाठी रोजगार यांच्यापेक्षा युद्धाला प्राधान्य द्यावे लागणे ही कोणत्याही देशासाठी दीर्घकालीन किंमत असते. युद्धाची खरी सामाजिक किंमत तरुण पिढीच्या आयुष्यावर दिसते. रशियात सैन्यात भरती होण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन, करारावर सैन्यात दाखल होणाऱ्या सैनिकांना मोठ्या रकमा आणि मासिक वेतन दिले जाते. काही ठिकाणी हे आर्थिक प्रोत्साहन लाखो रूबलपर्यंत पोहोचते. युद्धासाठी मनुष्यबळाची गरज वाढत गेल्याने तरुणांवर येणारा दबाव हा रशियन समाजातील संवेदनशील मुद्दा बनला आहे. ऑगस्टमध्ये युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी निवडणुकीनंतर रशिया मोठ्या प्रमाणात नव्या सैनिकांची भरती करू शकतो, असा दावा केला होता. हा रशियन सरकारने पुष्टी केलेला आकडा नसला, तरी युद्धासाठी अतिरिक्त मनुष्यबळाची गरज किती मोठी झाली आहे, याचा एक राजकीय संकेत म्हणून पाहता येते.

चर्चा आजची

ही तर दंडेलशाही ...



संतोष राऊळ

भारत देशाला पुर्वापार अशी आंदोलनाची परंपरा आहे. जेव्हा देशात आरजकत्ता पसरवली जाते तेव्हा सामान्य जनता रस्त्यावर उतरते. आपले हक्क आणि भविष्य उज्ज्वल ठेवण्यासाठी सत्ताधिकाऱ्याला किंवा संबंधित प्रशासनाला धारेदवर धरू शकतं. ही परंपरा इंग्रजांच्या राजवटीपासून सुरू आहे. आज इंग्रज देश सोडून जाऊन अनेक दशकं लोटली. तरी देखील देशात आंदोलनाची परंपरा कायम आहे. फरक एवढाच कि तेव्हा परकीय सत्ताधाऱ्यांविरोधात आंदोलनं व्हायची, आता मात्र स्थानिक सत्ताधारी आणि प्रशासनाविरोधात आंदोलनं छेडावी लागत आहेत. सध्या देशासह महाराष्ट्र राज्यात आंदोलनं सुरू आहेत. मात्र, हे आंदोलन एखाद्या सत्ताधाऱ्याविरोधात नसुन, भ्रष्ट प्रशासनाविरोधात आहे. सत्ताधिकारी दखल घेत नसल्याने नाहिलाजाने त्यांच्या विरोधात आंदोलकांना आवाज उठवावा लागत आहे. मात्र, या आंदोलनादरम्यान सत्ताधिकाऱ्यांकडून हुकुमशाही आणि दंडेलशाही पाहायला मिळत आहे. नुकतेच शनिवारी सीजेपी तर्फे एसआयआर प्रक्रियेविरोधात आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश्वर कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलनाची हाक देण्यात आली होती. हे आंदोलक शांततेत करणार होते. परंतु, सत्ताधिकाऱ्यांनी शांततेत त्यांच्याशी बोलून यावर तोडगा काढण्याऐवजी सत्तेचा माज दाखवत पोलिसांचा मोठा फौजफाटा उभा करून, दिल्ली कडे जाणारे सर्व रस्ते बंद करून, रेल्वे आणि मेट्रोसारख्या सेवा सुविधा देखील पुर्णपणे बंद केल्या होत्या. तसेच, पोलिसांनी आंदोलकांना त्यांच्या घरातून तसेच थेट विमानातून उचचलले आहे. त्यामुळे ही दंडेलशाही नाही तर काय? असा प्रश्न सर्वसामान्यांमधून उपस्थित होत आहे.

सध्या देशात निवडूक आयोगाकडून एसआयआर प्रक्रिया राबविली जात आहे. मात्र, या यादीतून अनेकांची नावे जाणिवपूर्वक गहाळ केल्याचे विरोधी पक्षाकडून बोलले जात आहे. त्याविरोधात विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आवाज उठवला होता. त्यानंतर शनिवारी सीजेपीकडून या आंदोलाची हाक देण्यात आली होती. सीजेपीतर्फे या आधी देखील नीट पेपर फुटी प्रकरणी आंदोलन छेडण्यात आले होते. तेव्हा देखील सत्ताधिकाऱ्यांची दंडेलशाही पाहायला मिळाली होती. आताही तेच झाले. शनिवारी सीजेपीने आंदोलनाची हाक काय दिली अन् त्यांना त्यांच्या घरातून आणि चक्क विमानातूनच उचललं. खरं तर हे आंदोलन प्रशासनाविरोधात होतं. हे आंदोलन निवडणूक आयोगाविरोधात आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश्वर कुमार यांच्या राजीनाम्यासाठी होतं. तेही शांततेत आंदोलन पार पाडलं जाणार होतं. परंतु, त्या आधिच आंदोलकांची धरपकड करणं हे कितपत योग्य आहे, असा सवाल सर्वसामान्यांमधून उपस्थित केला जात आहे. भलेही त्यांना २४ तासांनंतर सोडण्यात आलं; परंतु, तरीदेखील त्यांना जामिनावर सोडलं जात आहे, या पेक्षा मोठं दुःख ते काय? असेही बोलले जात आहे.

दिल्लीतील आंदोलनादरम्यान, ममता बॅनर्जी, अरविंद केजरिवाल, पिनारायी विजयन, मनिष सिसोदिया आणि अभिजित दिपके यांच्यासह हजारो आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले आणि त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली. त्यांनतर त्यांची तब्बल २४ तासांनंतर सुटका करण्यात आली. तीही काही अटी घालून जामिनावर सुटका करण्यात आली. त्यामुळे प्रश्न असा उपस्थित होतो की, जेव्हा देशात धर्माच्या नावाखाली दंगली घडल्या किंवा घडवल्या गेल्या तेव्हा हेच सत्ताधारी कुठे होते. त्यावेळी असा फौजफाटा का लावला जात नाही. जर आंदोलनाची चाहुल आधीच लागते तसेच, या दंगलींची देखील पोलिसांना आधीच चाहुल लागतच असेल ना. जरी त्यांना पकडलं तरी इज्जतीत पोलीस व्हॅनमध्ये बसवलं जातं आणि आंदोलकांचे हात पाय पकडून, फरफरट नेत पोलीस व्हॅनमध्ये बसवलं जातं. असं का? या उलट सत्ताधिकाऱ्यांनी किंवा संबंधित प्रशासनाने या आंदोलकांना भेटून त्यांच्याशी चर्चा करायला हवी होती. त्यांच्याशी बोलून काहीतरी तोडगा काढायला हवा होता. निदान एसआयआर प्रक्रियाचे विश्लेषण करणं गरजेचं होतं. त्यात ज्याकाही त्रुटी असतील त्या का झाल्या आहेत आणि का होत आहेत, यावर चर्चा व्हायला हवी होती. निदान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरी यात हस्तक्षेप करणं गरजेचं होतं. परंतु, ते कुठेच दिसत नाहीत. त्यामुळे उघड उघड स्पष्टच होत आहे की, हे आंदोलन दडपण्यामागे त्यांचाच हस्तक्षेप असावा, असे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे. तसेच, या आंदोलनादरम्यान सत्ताधिकाऱ्यांची दंडेलशाही पाहायला मिळत असल्याचे देखील बोलले जात आहे.

लोकसंसद

पोलिसांचा धाक कुणाला, अभय कुणाला?

दिल्लीमध्ये १० ऑक्टोबर रोजी आंदोलनादरम्यान पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलकांची धरपकड केली. मात्र, दुसरीकडे तथाकथित उजव्या विचारसरणीच्या संघटनांच्या कार्यकर्त्यांनी आंदोलकांना आणि पत्रकारांना मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या मारहाणीचे व्हिडिओ समाजमाध्यमांवरही मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आहेत. विशेष म्हणजे, काही ठिकाणी पोलिसांसमोरच आंदोलकांना मारहाण होत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. या प्रकरणी चार जणांना अटक झाल्याचेही वृत्त आहे. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार आहे, तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची आहे. आंदोलन बेकायदा वाटत असेल तर पोलिसांनी कायद्यानुसार कारवाई करावी; पण आंदोलकांना मारहाण करणाऱ्यांना मोकळीक मिळता कामा नये. आंदोलकांची धरपकड करण्यासाठी तत्पर असलेले पोलीस मारहाण करणाऱ्यांना रोखण्यात तेवढेच तत्पर का दिसले नाहीत? कायद्याची अंमलबजावणी करताना आंदोलक आणि त्यांच्यावर हल्ला करणारे यांच्यात भेद केला जात असेल, तर तो कोणाच्या इशाऱ्यावर? सरकारचे हे कोणते धोरण? कायदा सर्वांसाठी समान आहे, हे केवळ सांगण्यासाठी आहे की प्रत्यक्षातही त्याची अंमलबजावणी होणार आहे?

– दीपक काशिराम गुंडये, वरळी.

दिनविशेष

ख्यातनाम लेखिका, कवयित्री शांता शेळके



शांता शेळके या ख्यातनाम मराठी लेखिका, कवयित्री, अनुवादक व गीतकार. त्यांचे संपूर्ण नाव शांता जनार्दन शेळके. त्यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ रोजी इंदापूर (जि. पुणे) याठिकाणी झाला. खेड, मंचर या परिसरात त्यांचे बालपण व्यतीत झाले. शांताबाईंचे आजोबा (वडिलांचे वडील) अण्णा हे शाळामास्तर होते. शांताबाईंचे वडील रेंज फॉरेस्ट ऑफिसर होते. त्यांच्या बदलीच्या नोकरीमुळे चिखलदरा, नांदगाव, खर्डी या गावातही त्यांना वास्तव्य करावे लागले. एकूण ही पाच भावंडे त्यात शांताबाई सगळ्यात मोठ्या. आईच्या मृदू स्वभावाचे, तिच्या चित्रकलेचे, तिच्या वाचनवेडाचे संस्कार कळत-नकळत शांताबाईंवर होत राहिले. लहानपणी आजोळी गेल्यावर विविध पारंपरिक गीते, ओव्या, श्लोक त्यांच्या कानावर पडत. त्यामुळे कवितेची आवड, वाचनाची आवड, त्या संस्कारक्षम वयात रूजत गेली. त्यांचे पुढील शालेय शिक्षण पुण्याच्या हुजुरपागेत झाले. सुसंस्कृत सुविद्य, अभिजात अशा या शाळेतील वातावरणाचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. १९३८ मध्ये त्या मॅट्रिक झाल्या आणि पुण्याच्या स. प. महाविद्यालयातून बी. ए. झाल्या. या काळात साहित्याचे सखोल संस्कार त्यांच्यावर झाले. कॉलेजच्या नियतकालिकासाठी त्यांनी एक लेख लिहिला. प्रा. माटे यांच्या त्यावरील अभिप्रायाने त्यांना लेखनासाठी हुरूप आला. हळूहळू त्या कविता, लेख, लिहू लागल्या. १९४४ मध्ये संस्कृत घेऊन शांताबाई एम. ए. झाल्या. नागपूरचे हिस्लॉप कॉलेज, मुंबईचे रूईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयात त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

कविता, गीत, चित्रपटगीत, कथा, कादंबरी, बालसाहित्य अशा विविध साहित्यप्रकारात शांताबाईंची जवळपास शंभर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वर्षा (१९४७) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. रूपसी (१९५६), तोच चंद्रमा (१९७३), गोंदण (१९७५), कळ्यांचे दिवस, फुलांच्या राती (१९८६), जन्मजान्हवी (१९९०), चित्रगीते (१९९५), पूर्वसंध्या (१९९६), इत्यर्थ (१९९८) हे त्यांचे इतर काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. मुक्ता (१९४४), गुलमोहोर (१९४९), प्रेमिक (१९५६), काचकमळ (१९६९), सवाष्ण (१९७४), अनुबंध (१९८०), बासरी (१९८२), कविता करणारा कावळा (बालकथासंग्रह, १९८७), सागरिका (बालकथासंग्रह १९९०), हे कथासंग्रह; विझली ज्योत (१९४६), नरराक्षस (१९४८), पुनर्जन्म (१९५०), धर्म (१९७३), ओढ (१९७५), स्वप्नतरंग, कोजागिरी, मायेचा पाझर, या त्यांच्या कादंबऱ्या आहेत.

विविध साहित्यप्रकारात विहार करूनही त्यांचे पहिले आणि खरे प्रेम राहिले ते कवितेवरच. हळूवार भावकवितेपासून नाट्यगीते, भक्तीगीते, कोळीगीते, बालगीते, चित्रपटगीते, प्रासंगिक गीते अशा विविध रूपातून त्यांची कविता आपल्याला भेटत असते. सौंदर्यदृष्टी, रसिकता, मानवी मनोभूमिका आणि सहजता ही शांता शेळके यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये होत. अवतीभवतीचा सामाजिक, सांस्कृतिक अवकाश त्यांनी याच सौंदर्यदृष्टीतून आणि सहजतेतून अभिव्यक्त केला आहे. डेक्कन बालमित्र मंडळाचा यशवंतराव चव्हाण पुरस्कार (१९८८), कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचा कुसुमाग्रज पुरस्कार (१९९१), ग. दि. माडगुळकर पुरस्कार (१९९४) इत्यादी पुरस्कार त्यांना लाभले. अशा या लोकप्रिय लेखिकेचे ६ जून २००२ रोजी निधन झाले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ ऑक्टोबर

१) श्री.सुधाकर मधुसुदन वर्तक वरसोली, अलिबाग
१२-१०-१९५१

२) श्रीम. जयश्री जयंत राईलकर ब्राह्मणआळी, अलिबाग
१२-१०-१९५२

३) श्रीम. माधुरी ज.घोसाळकर सारळ, ता.अलिबाग
१२-१०-१९४९

४) श्री. आत्माराम महादेव म्हात्रे सातघर,पो.नारंगी
१२-१०-१९५२

५)श्रीम. अनुराधा बबन, श्रीम. पेणकर, नागाव, अलिबाग
१२-१०-१९६०

६) श्री. नरेंद्र नारायण नाईक म्हाडा कॉलनी, श्रीबाग नं.२
१२-१०-१९५४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३०००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल



संघमित्रा अजय कांबळे, वाढदिवस अलिबाग

मुरुड-जंजिरा शाखेला 'उत्कृष्ट' पुरस्कार

मुरूड : कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सन २०२४-२५ साठीचा वामनराव दाते स्मृती उत्कृष्ट कोमसाप शाखा पुरस्कार मुरुड-जंजिरा शाखेला जाहीर झाला आहे. या पुरस्कारामुळे कोमसाप मुरुड-जंजिरा शाखेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, शाखेचे सर्व सदस्य आणि पदाधिकाऱ्यांवर साहित्यविश्वातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महामार्गावरील दुभाजकांवर गवताचे साम्राज्य



अपघात घडण्याची भीती; वाहनचालक त्रस्त

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी एक नवी आणि गंभीर समस्या समोर आली आहे. या महामार्गाच्या दुभाजकांवर मोठ्या प्रमाणावर गवत, झुडपे आणि झाडी वाढली असल्यामुळे वाहनचालकांना वाहन चालवतांना मोठा अडथळा निर्माण होत आहे. या वाढलेल्या झाडीमुळे विशेषतः रात्रीच्या वेळी आणि तीव्र वळणांवर प्रवास करणे अधिक धोकादायक ठरत आहे. समोरून येणाऱ्या वाहनांच्या दिव्यांचा प्रकाश आणि दुभाजकांवरील झाडीमुळे रस्ता स्पष्ट दिसत नाही. त्यामुळे भीषण अपघाची शक्यता वर्तविली जात आहे.

मुंबई-गोवा महामागाचे काम गेल्या १७ वर्षांपासून सुरू असल्यामुळे तो चर्चेचा विषय ठरत आहे. या मार्गावरील रस्त्याची काही ठिकाणी अत्यंत दयनिय अवस्था झाली असून, अपघांच्या प्रमाणात देखील मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. त्यातच आता मुंबई-गोवा महामार्गावरील दुभाजकांवर उगवलेल्या गवत व वनस्पतींची पावसाळ्यानंतर छाटणी न केल्यामुळे हे गवत अत्यंत उंच वाढले आहे. त्यामुळे रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने येणारी वाहने, वळणांवर समोरून येणारी वाहतूक किंवा अचानक रस्ता ओलांडणारे प्राणी व नागरिक वाहनचालकांना दिसत नाहीत. परिणामी, अचानक ब्रेक दाबावा लागल्याने किंवा अंदाज न आल्याने अपघात घडण्याची तीव्र शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, या वाढलेल्या झाडीमुळे विशेषतः रात्रीच्या वेळी आणि तीव्र वळणांवर प्रवास करणे अधिक धोकादायक ठरत आहे. समोरून येणाऱ्या वाहनांच्या दिव्यांचा प्रकाश आणि दुभाजकांवरील झाडीमुळे रस्ता स्पष्ट दिसत नाही. त्यामुळे स्थानिकांसह नियमित प्रवास करणाऱ्या वाहनचालकांमधून तीव्र असंतोष व्यक्त केला जात असून, प्रशासनाने हे गवत व झाडी तात्काळ हटवण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने लवकर हे काम पूर्ण करून महामार्गावरील प्रवास सुरक्षित करावा, अशी अपेक्षा आता वाहनचालकांकडून व्यक्त केली जात आहे.

> **आम्ही काही दिवसांपूर्वी पाहणी केली आहे. पाऊस थांबल्यावर हे सर्व गवत व झाडी काढून साफसफाई करण्यात येणार होती. आता पाऊस गेल्याने हे काम सुरु केले असून, लवकरच पूर्ण करण्यात येईल. – रवींद्र इंगोळे, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण**

जलसंधारणासाठी पुढाकार

माणगाव : भविष्यातील पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी आतापासूनच जलसंधारणाच्या उपाययोजना हाती घेण्याची गरज ओळखून पंचायत समिती माणगावचे सभापती विलास शिंदे यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना प्रत्येक गावात किमान दहा सांडपाणी बंधारे बांधण्याचे आवाहन केले आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला लोकसहभागाची जोड देत गावागावांत जलसंधारणाची कामे करण्यावर त्यांनी भर दिला आहे. सभापती शिंदे यांनी दि.७ ऑक्टोबर रोजी पत्राद्वारे तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच व प्रशासनाला हे आवाहन केले आहे. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने 'वॉटर बजेट' अर्थात पाण्याचे अंदाजपत्रक तयार करून गावातील पाण्याची उपलब्धता आणि गरज यांचा विचार करावा. ग्रामपंचायत क्षेत्रात वनराई बंधारे, कच्चे बंधारे आणि इतर जलसंधारणाच्या उपाययोजना राबवून किमान १० बंधारे उभारण्याचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

भूषण टकेंचा विशेष सत्कार



■ (छायाचित्र : महेश पवार)

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठणे विभाग नाभिक समाजाचे अध्यक्ष बाळासाहेब टके यांच्या निवासस्थानी नवरात्रोत्सवानिमित्त टके कुटुंबीयांच्या कुलदैवताची घटस्थापना करण्यात आली. या मंगलमय प्रसंगाचे औचित्य साधून टके कुटुंबीयांचे सुपुत्र भूषण टके यांची अदाणी ग्रुपच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर 'रॅम्प सुपरवायझर' म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा नाभिक समाजाचे मार्गदर्शक भाई टके व नागोठणे विभाग नाभिक समाजाचे अध्यक्ष बाळासाहेब टके यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी दिलीपभाई टके कुटुंबीय, बाळासाहेब टके कुटुंबीय तसेच संपूर्ण टके परिवार उपस्थित होता.

मुरुडमध्ये तळपत्या उन्हाच्या झळा

| कोर्लई | प्रतिनिधी |

मागील आठवड्यापासून वातावरणात उष्णतामान मोठ्याप्रमाणात वाढले असून, हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार रविवारी (दि.११) तळपत्या उन्हाच्या झळांचा अनुभव मुरुडवासीयांना आला. दुपारच्या वेळेत तर अतीउष्णतेमुळे अक्षरशः अंगाची लाही लाही होत होती. उष्णतेमुळे पर्यटनावर परीणाम झाला असून, पर्यटक व नागरिकांनी घरातच राहणे पसंत केले असल्याचे चित्र दिसून आले. राज्यात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा तडाखा चांगलाच जाणवू लागला आहे. अनेक शहरांचे तापमान ३६ अंशाच्या वर गेले आहे. त्यामुळे अंगाची लाहीलाही होत आहे. पुढील दोन दिवसांत तापमानात पुन्हा वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. दरम्यान, रायगड जिल्ह्यातील मुरुड आणि कोकण विभागात रविवारपासून उष्ण आणि दमट हवामान कायम राहण्याचा अंदाज असून, हवामान विभागाने रायगडसह पालघर, ठाणे, मुंबई आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या अती उष्ण तापमानाचा परिणाम नारळी पोफळीच्या झाडांवर दिसून येत आहे. काही दिवस तापमान असेच राहिले तर याचा भातपीकावर देखील परिणाम होईल, असे स्थानिक शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे.



नागोठणेच्या शिरपेचात मानाचा तुरा

| नागोठणे | प्रतिनिधी |

लायन्स क्लब इंटरनॅशनल या सेवाभावी संस्थेतर्फे संपूर्ण रायगड जिल्ह्यात सेवा सप्ताह उपक्रम नुकताच राबविण्यात आला. या सेवा सप्ताहात लायन्स क्लब ऑफ नागोठणे यांच्याकडून राबविलेल्या विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रमांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल लायन्स डिस्ट्रिक्टमध्ये क्लबला तृतीय क्रमांकाचा मानाचा पुरस्कार मिळाला. लायन्स क्लब नागोठणेच्या संपूर्ण परिवारासाठी ही अभिमानाची आणि आनंदाची बाब असून, त्यामुळे लायन्स क्लब ऑफ नागोठणेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असल्याची प्रतिक्रिया नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष विलास चौलकर यांनी व्यक्त केली आहे.



लायन्स क्लब इंटरनॅशनलच्या रायगड जिल्हा अंतर्गत सेवा सप्ताह उपक्रमांचा बक्षीस वितरण सोहळा वाशी (नवी मुंबई) येथे नुकताच पार पडला. यावेळी प्रमुख उपस्थित म्हणून डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पीएमजेएफ प्रविण सरनाईक, पास्ट इंटर नॅशनल डायरेक्टर विजयकुमार राजु, पीआयडी पंकजकुमार मेहता, फर्स्ट व्ही. डि.जी. विनय गणात्रा, सेकंड व्ही.डि.जी. डॉ. नमिता मिश्रा, आयपीडीजी संजिव सुर्यवंशी, पीएमसीसी मार्गदर्शक ॲड. सुभाष भालेवाल, जीएसटी चेअरमन, पीएमजेएफ अनिल म्हात्रे तर नागोठणे लायन्स क्लबकडून पुरस्कार स्वीकारण्यासाठी अध्यक्ष विलास चौलकर, एमजेएफ यशवंत चित्रे, एमजेएफ विवेक सुभेदार, सेक्रेटरी डॉ. अनिल गीते, जॉईन्ट सेक्रेटरी विजय शहासने, जॉईन्ट ट्रेझरर विद्या म्हात्रे, सर्व लायन्स सदस्य अनुराधा शहासने, संतोष शहासने, सखाराम ताडकर, ॲड. महेंद्र धामणे आदी उपस्थित होते.

शासकीय वाहनाचे नुकसान

नवीन पनवेल : शासकीय वाहनाला धडक देऊन अपघात केल्याप्रकरणी चारचाकी वाहन चालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात ९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पावणेआठच्या सुमारास ब्रिझा कारवरील चालक यश बांगर याने कोपरा गाव पुलाच्या अलीकडे बस स्टॉप समोर त्याचे वाहन भरधाव वेगाने चालवले आणि सुरक्षित अंतर न ठेवता शासकीय वाहनाला मागील बाजूस ठोकर मारली आणि शासकीय वाहनाचे नुकसान केले.

सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांसाठी जागा उपलब्ध

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड जांभूळपाडा कार्यालयात सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांना नियमित बसण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शासनाच्या कृषी योजना, अनुदान आणि अर्ज प्रक्रियेबाबत एकाच ठिकाणी सहजरित्या मार्गदर्शन मिळणार असून, कृषी योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे.

सुधागड वैभव फार्मर्स प्रोड्युसर्स कंपनीचे संचालक दत्तात्रय दळवी यांनी दि.३० सप्टेंबर रोजी ग्रामपंचायतीला पत्र देऊन सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांना ग्रामपंचायत कार्यालयात ठराविक दिवशी व वेळेत बसण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. शासनाच्या विविध कृषी योजना, अनुदान आणि मार्गदर्शनासाठी सहाय्यक कृषी अधिकारी वेळेनुसार गावात येतात; मात्र, योग्य बैठकीची जागा नसल्यामुळे सर्व शेतकऱ्यांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचणे त्यांना कठीण जात होते. परिणामी अनेक शेतकरी शासकीय योजनांच्या माहितीपासून व लाभांपासून वंचित राहत होते. या समस्येवर तोडगा म्हणून ही मागणी करण्यात आली होती. सुधागड वैभव फार्मर्स प्रोड्युसर्स कंपनीच्या अर्जाची दखल घेत, वऱ्हाड जांभूळपाडा ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत दि.३० सप्टेंबर रोजी या विषयावर चर्चा करण्यात आली.



■ (छायाचित्र: धम्मशील सावंत)

राबगाव शाळेमध्ये प्रयोगांतून विज्ञानाशी मैत्री

| पाली | प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि छोट्या-छोट्या प्रयोगांतून वैज्ञानिक संकल्पना समजाव्यात, या उद्देशाने सुधागड तालुक्यातील राबगाव शाळेमध्ये शनिवारी (दि.९) 'करूया विज्ञानाशी मैत्री' हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात चेंबूर येथील भाभा अणुशक्ती केंद्रातील निवृत्त अधिकारी व उंबरवाडी येथील रहिवासी करूण हंबीर यांनी विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिक प्रयोग दाखवून मार्गदर्शन केले. या उपक्रमातून विज्ञान हा केवळ पुस्तकातून शिकण्याचा विषय नसून प्रत्यक्ष प्रयोगांतूनही तो सहज समजून घेता येतो, याची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. हंबीर यांनी छोट्या-छोट्या प्रयोगांच्या साहाय्याने विज्ञान कसे शिकता येते, याविषयी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. वैज्ञानिक जागृती घडविण्याच्या दृष्टीने ही प्रात्यक्षिके महत्त्वपूर्ण ठरली. तसेच, पाठ्यपुस्तकातील संकल्पनांना प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाल्यास विज्ञान शिकणे अधिक सोपे होते.



महागड्या भाजीपाल्याला आरोग्यदायी पर्याय | ठाकरी मिरचीला मोठी मागणी

गावरान भाज्यांची आवक वाढली

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

वातावरणातील बदल आणि पावसाची कमतरता यामुळे भाजीपाल्याचे उत्पादन घटल्याने पुणे व नवी मुंबईतून येणाऱ्या भाजीपाल्याच्या दरांमध्ये मोठी चढउतार पाहायला मिळत आहे. मात्र, या महागड्या भाजीपाल्याला सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी पिकवलेल्या सेंद्रिय गावरान भाज्यांचा एक स्वस्त, पौष्टिक आणि आरोग्यदायी पर्याय उपलब्ध झाला आहे. सध्या स्थानिक बाजारात गावरान भाज्यांची आवक प्रचंड वाढली असून, ठाकरी मिरचीला मोठी मागणी आहे.

आदिवासी बांधव व स्थानिक शेतकरी डोंगर-उतारावर, रानमाळावर आणि घराच्या परसात कोणत्याही रासायनिक खतांचा किंवा किटकनाशकांचा वापर न करता या भाज्या पिकवतात. आणि आदिवासी महिला बाजारात विक्रीसाठी घेऊन येतात. बाजारात सध्या शिराळे, घोसाळे, कारली, माठ, वांगी, भेंडी, काकडी, दुधी, गवार आणि ठाकरी मिरची मुबलक प्रमाणात दाखल झाली आहे. अवघ्या १५ ते २० रुपये जुडी, वाटा किंवा पाव किलो अशा परवडणाऱ्या दरात या भाज्या मिळत असल्याने ग्राहकांकडून मोठी मागणी होत आहे.



ठाकरी मिरचीची खास भुरळ

या सर्व गावरान भाज्यांमध्ये आदिवासी बांधवांनी पारंपारिक पद्धतीने पिकवलेली 'ठाकरी मिरची' (ज्याला बुटकी किंवा ठेंगू मिरचीही म्हणतात) विशेष आकर्षण ठरत आहे. अतिशय तिखट आणि चविष्ट असलेली ही ठाकरी मिरची तेलात तळून, हळद-मीठ लावून वाळवून किंवा तिचे लोणचे करून खाल्ली जाते. या मिरचीचा ठेचा अथवा चटणी जेवणाची चव वाढवणारी ठरते.


> **गावरान भाज्या पौष्टिक व सेंद्रिय असल्याने अत्यंत आरोग्यदायी आहेत. विशेषतः ठाकरी मिरची या पारंपारिक वाणाला पेटंट मिळायला हवे. आदिवासी व ठाकूर बांधवांना योग्य हमीभाव, हक्काची बाजारपेठ आणि शास्त्रीय मार्गदर्शन मिळाल्यास, इतर हंगामांतही उत्पादन घेऊन त्यांचा आर्थिक स्तर उंचावता येईल. – राजू बांगारे, शिक्षक, सुधागड**

निवडक



बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी उपक्रम

नेरळ : शालेय विद्यार्थ्यांच्या चौकस बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी रोटरी क्लब कार्य करीत आहे. या संस्थेच्या व एनईपी २०२० धोरणाच्या माध्यमातून आदर्श युवा घडवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमात नेरळ परिसरातील सहा शाळांचा सहभाग होता. किशोरवयीन विद्यार्थ्यांना समाजाप्रती सहसंवेदना निर्माण होऊन सामाजिक जाणीव प्रगल्भ होण्यासाठी, सकारात्मक दृष्टिकोन रूजविण्यासाठी, सर्जनशीलता विकसित होऊन एनईपी २०२० धोरणातील आदर्श युवा घडविण्यासाठी उपक्रम राबविण्यात आला. यावेळेस रोटरी क्लब ऑफ मुंबई माहिम केंद्राच्या अध्यक्षा सुनिता पडवळ, सचिव वंदना राजहंस, खजिनदार वीणा वाटवे, समन्वयक अर्चना खळे, युवा समाजसेवा उपक्रम प्रमुख अलका खेडकर, जिल्हा समन्वयक राजन दोआ, विद्या मंदिर मंडळाचे संयुक्त सचिव विवेकानंद पोतदार, विश्वस्त मिलिंद पोतदार, मुख्याध्यापक के.बी. भांडे, प्रकल्प प्रमुख संजय शिंदे, शिल्पा लाड, महेश मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



आश्रमशाळेत विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी

नेरळ : जागतिक दृष्टी दिनानिमित्त कर्जत तालुक्यातील पाथरज येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत नेत्रआरोग्य जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी ''लव्ह युवर आईज'' यावर आधारित उपक्रम राबविण्यात आला. या संकल्पनेवर आधारित नेत्र आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, हेल्थकेअर युनिट, कर्जत आणि लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पाथराज येथील आश्रमशाळेत विद्यार्थ्यांसाठी नेत्ररोग व डोळ्यांची काळजी या विषयावर मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. या कार्यक्रमात लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आय हॉस्पिटलच्या अक्षता गायकवाड (ऑप्टोमेट्रिस्ट) यांनी विद्यार्थ्यांना डोळ्यांचे आरोग्य जपण्याचे महत्त्व पटवून दिले. डोळ्यांची योग्य निगा कशी राखावी, नेत्ररोगांची लक्षणे कशी ओळखावीत आणि डोळ्यांशी संबंधित समस्या उद्भवल्यास योग्य वेळी तज्ज्ञांचा सल्ला कसा घ्यावा, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. या जनजागृती सत्रात पाथराज आश्रमशाळेतील आठवी-नववी मधील एकूण ९७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी डोळ्यांच्या आरोग्याशी संबंधित विविध प्रश्न विचारून चर्चेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



सरकता जिन्याच्या कामाला गती

नेरळ : नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर सरकत्या जिन्याच्या कामांना आता पुन्हा वेग आला आहे. नेरळ स्थानकात कर्जत दिशेकडे जाणाऱ्या मार्गावर दोन सरकते जिने असून, मुंबईकडे जाणाऱ्या बाजूला एकही सरकता जिना कार्यान्वित नाही. दरम्यान, मुंबई रेल कॉर्पोरेशनकडून नेरळ स्थानकात अनेक महिने रखडलेल्या सरकत्या जिना यांच्या कामांना गती आली आहे. नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकाचा कायापालट सुरू असून, नेरळ स्थानकात फलाट दोनवरील कामे मंदगतीने सुरू आहेत. स्थानकातील स्काय वॉकचे काम धीम्यागतीने सुरू असताना या फलाटावर असलेले सरकते जिने यांची कामे देखील अडखळत सुरू आहेत. मुंबई दिशेकडे जाणारी उपनगर लोकल यांच्या फलाट दोन वरील स्थानकात दोन सरकते जिने प्रस्तावित आहेत. या दोन्ही सरकत्या जिन्याच्या कामे ठप्प होती. दरम्यान, स्थानकाच्या मध्यभागी असलेल्या सरकत्या जिन्याच्या कामाला गती मिळाली होती. तर, मुंबई दिशेकडे असलेल्या सरकत्या जिन्याच्या कामाने देखील गती घेतली आहे.

विद्यार्थ्यांनी साकारले विकसित भारताचे स्वप्न



खरोशी : सेवा संकल्प अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय चित्र प्रदर्शन दि.८ ऑक्टोबर रोजी पेण येथील गुरुकुल हायस्कूलमध्ये भरवण्यात आले होते. त्यामध्ये तिसरी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आपली कला सादर करून विकसित भारताचे चित्र सादर करून विद्यार्थ्यांनी आपली कला जोपासली. तसेच, या चित्रकला स्पर्धेत भाग घेतलेल्या तालुका स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावेळी विकसित भारत, राष्ट्रनिर्मिती नवभारताची संकल्पना, स्वच्छ व सक्षम भारत, पर्यावरण संवर्धन, तंत्रज्ञान शिक्षण, कौशल्य व रोजगार या विषयांवर विद्यार्थ्यांना ''विकसित भारत'' व ''२०४७ मध्ये भारताचे चित्र कसे असेल'' हे चित्रकलेचे विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आधुनिक भारताचे चित्र आपल्या कलेद्वारे सादरीकरण करून ते प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेऊन उत्कृष्ट कलाकृती सादर केल्या सहभागी आणि गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

निवडक



बालविकास प्रकल्पांतर्गत नवव्या राष्ट्रीय पोषण माहची सांगता

पाताळगंगा : खालापूर पंचायत समितीच्या बालविकास प्रकल्पांतर्गत नवव्या राष्ट्रीय पोषण माहची सांगता विविध उपक्रमांनी उत्साहात करण्यात आली. केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने दि. ९ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या या अभियानातून सकस आहार आणि कुपोषणमुक्त समाजाचा संदेश देण्यात आला. यंदाच्या पोषण माहची संकल्पना 'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' अर्थात 'आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी' अशी होती. अंगणवाडी केंद्रांचे सक्षमीकरण आणि लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला. अंगणवाडी सेविका व महिलांच्या सहभागातून तृणधान्ये आणि स्थानिक पौष्टिक पदार्थांपासून तयार केलेल्या प्रथिनयुक्त पाककृतींचे प्रदर्शन भरविण्यात आले. यावेळी दोन महिलांचा ओटीभरण कार्यक्रमही घेण्यात आला. कुपोषणमुक्तीचा संदेश देण्यासाठी विविध गावांत पोषण रॅली काढण्यात आल्या. यावेळी खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, जि.प. सदस्या रेश्मा पाटील, उपसभापती भाई शिंदे, पंचायत समिती सदस्या अर्चना भोईर, गौरीताई गडगे, प्रमिला पाटील बालविकास प्रकल्प अधिकारी विशाल कोतगडे, प्रीतम घोसाळकर, आरती तेलकडे, मनिषा कांबळे तसेच मुख्य सेविका, आरोग्य विभागाचे कर्मचारी, स्थानिक आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि स्थानिक माता उपस्थित होत्या.



ऑक्टोबरमध्ये उन्हाचा तडाखा वाढला

म्हसळा : ऑक्टोबर महिन्यात उन्हाळ्याप्रमाणे तापमानात वाढ होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. दिवसभर जाणवणारा उष्णतेचा तडाखा आणि घामाच्या धारांमुळे नागरिकांना वारंवार तहान लागत असून, तहान भागविण्यासाठी फळांचे रस, उसाचा रस, थंड पेये, लिंबूपाणी तसेच दही-ताक यांसारख्या शीतपेयांकडे नागरिकांचा कल वाढला आहे. म्हसळा शहरातील फळविक्रेते आणि रसवंतिगृहांकडे नागरिकांची वर्दळ वाढताना दिसत आहे. साधारणपणे पावसाळा संपल्यानंतर वातावरणात गारवा जाणवण्याची अपेक्षा असते. मात्र, यंदा ऑक्टोबर महिन्यात उन्हाचा कडाका कायम असल्याने नागरिकांना उन्हाळ्याची तीव्रता जाणवत आहे. दुपारच्या वेळी उन्हाची तीव्रता अधिक जाणवत असल्यामुळे बाजारपेठेत कामानिमित्त बाहेर पडणारे नागरिक, व्यापारी, प्रवासी तसेच दुचाकीस्वार थंड पेये घेऊन तहान भागविताना दिसत आहेत. शहरातील फळांच्या दुकानांमध्ये सफरचंद, अननस, मोसंबी, संत्री, डाळिंब, चिकू केळ, ड्रॅगन फ्रुट यांसारख्या फळांचे रस तसेच उसाचा रस, लिंबूपाणी आणि इतर थंड पेयांना मागणी वाढत आहे. त्याचबरोबर शरीराला थंडावा मिळावा म्हणून दही-ताक पिण्याकडेही अनेकांचा कल आहे. उन्हाच्या झळांपासून काही काळ दिलासा मिळावा या उद्देशाने नागरिक शीतपेयांचा आधार घेत असल्याने ग्राहकांची गर्दी होताना दिसत आहे.



वसुंधरा पायी दिंडीचे जंगी स्वागत

चिरनेर : जगद्गुरू श्रीमत रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या 'वसुंधरा पायी दिंडी' साई देवस्थान, साईनगर, वहाळ, पनवेल येथे पोहोचल्यावर साई देवस्थानतर्फे संस्थापक अध्यक्ष रवी पाटील यांच्यावतीने उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी माजी जि.प. सदस्या पार्वती पाटील, जगन पाटील, अनंत पाटील, मो.का. मढवी, शिरीष ठाकूर, विश्वास पाटील, रामकृष्ण महाराज, श्रीकांत मुंबईकर आदींसह साई भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'वृक्ष वाचवा, पर्यावरण वाचवा आणि वसुंधरेचे रक्षण करा' हा संदेश घेऊन हजारो अनुयायी या दिंडीच्या माध्यमातून नाणीजधामच्या दिशेने मार्गस्थ झाले आहेत. जगद्गुरूंच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या उपक्रमात अध्यात्मासोबत पर्यावरण संवर्धनाचा जागर करण्यात येत असून, गावागावांत स्वच्छता, वृक्षारोपण, निसर्गसंवर्धन आणि पर्यावरणाविषयी जनजागृती केली जात आहे. मुंबई पीठाच्या वतीने वसई तालुक्यातील शिरसाड येथून या दिंडीचा उत्साहात शुभारंभ झाला. वसई ते नाणीजधाम असा सुमारे ५०० किलोमीटरचा प्रवास दिंडीकडून करण्यात येत असून, सुमारे १६ दिवसांच्या या प्रवासात दररोज २० ते २५ किलोमीटरचे अंतर पार केले जात आहे. साईनगर येथे दिंडीचे आगमन होाच भाविक व सेवेकऱ्यांनी फुलांची उधळण, जयघोष आणि भक्तिमय वातावरणात दिंडीचे मनःपूर्वक स्वागत केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● सन स्टोन रीअल इस्टेट अलिबाग ते मांडवा बंगलो+प्लॅट+रिसॉर्ट भाड्याने पाहिजे. N.A.plot + शेतजमिन खरेदी व विक्री करुन मिळेल. शेतकरी करतो. ८६६९००६९०२ साइना कॉम्प्लेक्स opp. चर्च बायपास रोड.

● अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे! ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक. आकर्षक पगार मुलाखतीसाठी संपर्क साधा! ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

माणगावच्या भातपिकावर संकटाची कुऱ्हाड

पावसाच्या दडीमुळे पिके सुकली; तातडीने पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची मागणी

। माणगाव । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात पावसाने दीर्घ उघडीप दिल्याने खरीप हंगामातील भातशेती संकटाच्या छायेत सापडली आहे. भातपीक वाढीच्या आणि दाणे भरण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर असतानाच पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पावसाअभावी शेतातील ओलावा झपाट्याने कमी होत असून, काही भागांत भाताची रोपे पिवळी पडू लागली आहेत. पिकांची वाढ खुंटण्याची भीतीही व्यक्त होत आहे. वर्षभराच्या मेहनतीवर आणि शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर उत्पादनात घट होण्याचे संकट उभे ठाकले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे माणगावच्या भातशेतीवर संकटाची कुराड बसली असून, रायगडातील भाताचे कोठार धोक्यात आले आहे.



खरीप हंगाम २०२५ मध्ये माणगाव तालुक्यात सुमारे ७,००० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर भातलागवडीचे नियोजन होते. मात्र, हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाने दिलेला हुलकावणी आणि त्यानंतर झालेली अतिवृष्टी यामुळे भातक्षेत्रात घट झाली. प्रत्यक्षात ६,९५० हेक्टरवर भाताची लागवड झाली, तर नाचणी पीक ६५० हेक्टरवर घेण्यात आले. तालुक्याच्या ग्रामीण भागात भातशेती हाच शेतीचा प्रमुख आधार आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी लागवड पूर्ण केली. रोपांची वाढ चांगली होईल आणि यंदा समाधानकारक उत्पादन हाती येईल, अशी आशा त्यांना होती. परंतु, सप्टेंबरमधील पावसाची अनियमितता आणि ऑक्टोबरच्या सुरुवातीपासून जाणवणारी उघडीप यामुळे या आशेवर पाणी फिरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. भातपिकाच्या वाढीच्या निर्णायक टप्प्यावर पुरेशा पाण्याची गरज असते. मात्र, पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील पाण्याची पातळी घटत असून, जमिनीतील ओलावाही कमी होत आहे. परिणामी, काही ठिकाणी पिके पिवळी पडत असल्याचे चित्र आहे. ही स्थिती कायम राहिल्यास पिकांची वाढ, दाणे भरण्याची प्रक्रिया आणि अंतिम उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

बियाणे, खते, मजुरी आणि मशागतीसाठी शेतकऱ्यांनी आधीच मोठा खर्च केला आहे. आता पीक हाताशी येण्याच्या काळातच पावसाने दडी मारल्याने संपूर्ण हंगामाच्या उत्पन्नाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

उत्पादन घटल्यास वर्षभराची धान्याची गरज भागवणे आणि शेतीसाठी घेतलेली उधारी फेडणे कठीण होऊ शकते. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडण्याची भीती व्यक्त होत आहे. पावसातील खंडाचा भातपिकावर नेमका किती परिणाम झाला, याचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन होणे आवश्यक आहे. तालुका कृषी विभाग आणि महसूल प्रशासनाने बाधित गावांतील शेतांची प्रत्यक्ष पाहणी करून पिकांच्या सद्यःस्थितीचा आढावा घ्यावा. संभाव्य उत्पादनघट लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना निश्चित कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


प्रशासनाकडून मदतीची अपेक्षा

हवामानातील बदल आणि पावसाची अनिश्चितता यांचा थेट फटका शेतीला बसत असताना शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांवर अवलंबून ठेवून चालणार नाही. प्रत्यक्ष पाहणी, नुकसानीचे अचूक मूल्यांकन आणि पात्र शेतकऱ्यांना वेळेत मदत यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी भातपीक हे केवळ उत्पन्नाचे साधन नसून वर्षभराच्या अन्नसुरक्षेचा आधार आहे. त्यामुळे ऐन हंगामात उभ्या ठाकलेल्या या संकटाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. पावसाची उघडीप आणखी लांबल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नुकसान वाढण्याची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने आढावा घेऊन आवश्यक मदतीसाठी पावले उचलावीत, अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे

चिरनेरमध्ये नऊ दिवस आदिशक्तीचा जागर

। चिरनेर । प्रतिनिधी ।

नवरात्र उत्सवाला आजपासून प्रारंभ झाला असून, चिरनेर जंगल सत्याग्रह व श्री महागणपती तीर्थस्थानामुळे ऐतिहासिक महत्त्व असलेल्या इतिहास प्रसिद्ध चिरनेर गावात अभिनव सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ, सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ चिरनेर रांजणपाडा चिंचपाडा, दुर्गामाता नवरात्र उत्सव मंडळ चिरनेर कातळपाडा, सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ रेवसकर गल्ली कातळपाडा, सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ कुंभारपाडा या आणि या परिसरातील अनेक प्रतिष्ठित नवरात्र उत्सव मंडळांच्या माध्यमातून यंदाही



या उत्सवाचे आकर्षण तितक्याच उत्साहात व दिमाखात दिसून येत आहे. त्यामुळे आदिशक्तीच्या भक्तांमध्ये आनंदाचे व चैतन्याचे वातावरण आहे.

नऊ दिवस आदिशक्तीचा चिरनेर परिसरात जागर होणार असल्यामुळे चिरनेर परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. गरबा, दांडिया नृत्य फॅन्सी ड्रेस, फनी गेम्स, होम विधी, फॅशन शो, पारंपारिक नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम, हळदी कुंकू, होम मिनिस्टर, मंगळागौर, भजन, व्याख्यान, अंबेचा गोंधळ, सत्यनारायणाची पूजा, महाआरती, ज्येष्ठ भजन मंडळीचा अभिनव सन्मान, महाप्रसाद व भव्य मिरवणूक या सर्व कार्यक्रमांचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक व तरुणाई सहभागी होणार असल्याने मंडळांकडून आकर्षक व प्रशस्त मंडप उभारले गेले आहेत. दरम्यान भव्य मंडप, आकर्षक विद्युत रोषणाई व सजावट आणि दुर्गामातेची प्रतिष्ठापना यामुळे भाविकांमध्ये आनंदाचे व चैतन्याचे वातावरण दिसून येत आहे.

ॲल्युमिनियमच्या शिड्यांची चोरी

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

दुकानाच्या बाहेर उभ्या केलेल्या ॲल्युमिनियमच्या शिड्या चोरून नेल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात ९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सादिक हुसेन शेख यांचे २७ सप्टेंबर रोजी अल सलार कॅफे, तळोजा, सेक्टर १६, फेज २ या दुकानाच्या बाहेर उभ्या केलेल्या १६ हजार रुपये किमतीच्या दोन ॲल्युमिनियमच्या शिड्या चोराने चोरून नेल्या. याप्रकरणी नऊ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

डॉ. केजरीवालांच्या मारहाणीचा निषेध

- खोपोलीतील डॉक्टर आक्रमक
- एक दिवस बाह्यरुग्ण सेवा बंद

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोलीतील बालरोगतज्ज्ञ डॉ. जयंत केजरीवाल यांना झालेली मारहाण आणि सुमित्राराज रुग्णालयातील तोडफोडीच्या घटनेचा खोपोलीतील विविध डॉक्टर संघटनांनी तीव्र निषेध केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ ९ ऑक्टोबर रोजी एक दिवस बाह्यरुग्ण तपासणी सेवा बंद ठेवून डॉक्टरांनी काम बंद आंदोलन केले. मात्र, रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून अत्यावश्यक वैद्यकीय सेवा सुरू ठेवण्यात आल्याची माहिती खोपोली डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सतीष जाखोटीया यांनी दिली.

याप्रकरणाची माहिती देण्यासाठी १० ऑक्टोबर रोजी खोपोलीत पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खोपोली डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सतीष जाखोटीया, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष कटकदौड, खालापूर तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हेमंत पाटील, सेक्रेटरी डॉ. नागरगोजे, बालरोगतज्ज्ञ डॉ. जयंत केजरीवाल, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. संगिता केजरीवाल यांच्यासह खोपोली शहर व खालापूर तालुक्यातील अनेक डॉक्टर उपस्थित होते.

२३ लाख ८५ हजारांची फसवणूक

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

३२० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून २३ लाख ८५ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात नऊ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

संजय उपडे (रा. कामोठे) यांना आरोपींनी टेलिग्राम आणि व्हॉट्सअप आणि आराटाई या चॅटिंग ॲपवर ओळख करून शेअर मार्केट आणि आयपीओच्या नावाने गुंतवणूक करण्यास सांगितले. यासाठी एक सब अकाऊंट उघडण्यास सांगून त्यात गुंतवणूक करण्यासाठी वेगवेगळ्या बँक खाते दिले. आणि वेळोवेळी पैसे गुंतवणूक करून घेऊन त्यावर ३२० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवले. आणि त्यांच्याकडून २३ लाख ८५ हजार रुपये रक्कम शेअर मार्केट आणि आयपीओच्या नावाने ऑनलाईन घेऊन फसवणूक केली.

कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे : मनवे

। म्हसळा । प्रतिनिधी ।

ग्रामपंचायतीसोबत निगडित असलेल्या सर्वच शासकीय कर्मचाऱ्यांनी आपापले कर्तव्य व्यवस्थित पार पाडून जबाबदारीने काम केले तरच शासनाच्या विविध योजना संबंधित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवता येतील, असे प्रतिपादन पं.स.सभापती बबन मनवे यांनी केले.



राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन २०२५-२६, राज्य व्यवस्थपन कक्ष पुणे, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती म्हसळा, श्री मौनी विद्यापीठ गारगोटी यांच्या संयुक्त विद्यमाने सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे ग्रामपंचायत स्व उत्पन्नाचे स्रोत याबाबत चार दिवस प्रशिक्षण म्हसळा पंचायत समिती सभागृह, सार्वजनिक वाचनालय सभागृह, आगरी समाज सभागृह मेदडी आणि मराठा भवन सभागृह खामगाव येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षण ठिकाणी तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रापं सदस्य, अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, बचत गटाच्या सीआरपी, ग्रापं कर्मचारी उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन बबन मनवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मौनी विद्यापीठ गारगोटी, कोल्हापूर येथील प्राध्यापक व्ही.व्ही.चौगुले तसेच यशदाचे मास्टर ट्रेनर कमलेश कोरपे, विनोद कोरपे, सीताराम कडू यांनी मार्गदर्शन केले. सभापती बबन मनवे, उपसभापती लहू म्हात्रे, जि.प. दस्य अनिल बसवत, प्रियांका निंबरे, समृद्धी चाचले, गटविकास अधिकारी मंगेश साळी, विस्तार अधिकारी दामोदर दिघिकर, हेमंत माळी, पत्रकार संजय खांबेटे उपस्थित होते.

दोघांविरोधात मारहाणीचा गुन्हा

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

लाकडी फळीने मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

९ ऑक्टोबर रोजी जयराम तुकाराम पाटील आणि स्वप्निल जयराम पाटील यांनी त्यांच्या पाण्याच्या नळाला प्रेशर मोटर लावून पाणी भरल्याने राजेंद्र तुकाराम पाटील (५४, रा. सांगडे) यांच्याकडे पाणी येत नव्हते, याचा जाब जयराम आणि स्वप्निल यांना विचारला असता त्याचा त्यांना राग आला आणि त्या दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच जयराम पाटील यांनी लाकडी फळी राजेंद्र यांच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले.

परदेशातील जीवलगांना पाठवा दिवाळी फराळ

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दिवाळी म्हणजे आनंद, प्रेम, आपुलकी आणि गोडधोड पदार्थांची रेलचेल! नोकरी, व्यवसाय किंवा शिक्षणानिमित्त परदेशात राहणाऱ्या आपल्या मुला-मुलींना, नातेवाईकांना आणि जीवलगांना दिवाळीचा फराळ पाठविण्याची इच्छा प्रत्येकालाच असते. मात्र, अंतरामुळे आणि कुरिअरच्या खर्चामुळे अनेकदा ही इच्छा अपूर्ण राहते. आता रायगडकरांची ही अडचण दूर करण्यासाठी भारतीय डाक विभागाने दिवाळी फराळ पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

रायगड जिल्ह्यातील सर्व पोस्ट ऑफिसमध्ये ही सुविधा उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांनाही या सेवेचा लाभ घेता येणार आहे. जिल्ह्याच्या दुर्गम तसेच ग्रामीण भागातून परदेशात राहणाऱ्या आपल्या जिवलगांपर्यंत दिवाळीचा गोडवा पोहोचविणे आता अधिक सोयीचे होणार आहे.

खासगी कुरिअर सेवांच्या तुलनेत भारतीय डाक विभागामार्फत उपलब्ध असलेली सेवा कमी खर्चात उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी फराळ पाठविण्यापूर्वी टपाल शुल्क, वजनमर्यादा, संबंधित देशातील नियम आणि खाद्यपदार्थ पाठविण्याच्या अटी यांची जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये माहिती घ्यावी. योग्य पॅकिंग करून फराळ पाठविल्यास परदेशात राहणाऱ्या आप्तेष्टांनाही मायभूमीतील दिवाळीच्या गोड आठवणी अनुभवता येतील. रायगड डाक अधीक्षक आर.बी. रनाळकर यांनी नागरिकांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

पाणदिवे शाळेत निसर्ग संवर्धनाचा जागर

। उरण । प्रतिनिधी ।

वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त पुंडलिक रामा पाटील इंग्रजी माध्यम शाळा, पाणदिवे-उरण येथे फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था, चिरनेर, ता. उरण, जि. रायगड यांच्या वतीने निसर्ग संवर्धनविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात वन्यजीवांचे निसर्गातील महत्त्व, सर्पओळख, सर्पदंशावरील प्रथमोपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना यांसह पर्यावरणाशी संबंधित विविध गंभीर विषयांवर विद्यार्थ्यांशी आणि उपस्थितांशी संवाद साधण्यात आला.

'शून्य सर्पदंश मृत्यू अभियान' हा कार्यक्रमाचा महत्त्वपूर्ण विषय होता. सापांच्या विविध प्रजातींची ओळख, सापांविषयी असलेले गैरसमज दूर करणे, सर्पदंशाच्या घटना टाळण्यासाठी घ्यावयाची



काळजी आणि सर्पदंश झाल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घेण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. साप आणि इतर वन्यजीव हे पर्यावरणाचा समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे वन्यजीवांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष जयवंत ठाकूर आणि राकेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून निसर्ग, वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि निसर्ग संरक्षणाची भावना रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका योगीता गुरुनाथ गावंड, प्राची प्रशांत परदेशी, हेमांगी शैलेश गावंड, स्मिता मंगेश जाधव, सुरक्षा अविनाश भोईर आणि मनाली गावंड यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वन्यजीवांचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर यांचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरला.

किडझी शाळेत जागतिक टपाल दिन साजरा | पोस्टमन दादांची भेट अन् आई-बाबांसाठी शुभेच्छापत्रे

चिमुकल्यांनी अनुभवली पत्रांची जादू!

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मोबाईलच्या एका क्लिकवर संदेश पोहोचण्याच्या आजच्या डिजिटल युगात पत्रांचा गोडवा, टपाल सेवेचे महत्त्व आणि पोस्टमन दादांच्या कामाची ओळख चिमुकल्यांना व्हावी, या सुंदर संकल्पनेतून किडझी शाळेत जागतिक टपाल दिन अनोख्या, आगळ्यावेगळ्या आणि भावस्पर्शी पद्धतीने साजरा करण्यात आला.

जागतिक टपाल दिनाचे औचित्य साधून टपाल विभागाचे मुख्य जिल्हा अधीक्षक राजेश रनाळकर यांच्या संकल्पनेतून आणि किडझी शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्या माध्यमातून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. लहान वयातच मुलांना टपाल सेवेची



ओळख व्हावी, त्यांना पत्रलेखनाची गोडी लागावी आणि आई-वडिलांप्रती प्रेम, आदर व आपुलकी व्यक्त करण्याची संधी मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आई-बाबांसाठी सुंदर शुभेच्छापत्रे तयार केली. आपल्या लाडक्या आई-बाबांना प्रेमाचे संदेश लिहिताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि डोळ्यांतील उत्सुकता पाहण्यासारखी होती. त्यानंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या टपाल पेटीच्या प्रतिकृतीत ही पत्रे टाकून प्रत्यक्ष टपालात पाठविली.

अभिनव संकल्पनेचे सर्वत्र कौतुक

लहान मुलांना खेळातून, कृतीतून आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि ज्ञानवर्धक ठरला. किडझी शाळेच्या मुख्याध्यापिका आणि शिक्षकवृंदाचे समीर म्हात्रे यांनी आभार मानले तेर किडझी शाळेच्या मुख्याध्यापिका आणि शिक्षकवृंदाने या आगळ्यावेगळ्या उपक्रमाबद्दल रायगड डाक अधीक्षक राजेश रनाळकर यांचे विशेष कौतुक केले.

टपालविश्वाची अनोखी खिडकी!

पोस्ट ऑफिसमध्ये नेमके काय काम चालते? पत्रे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कशी पोहोचतात? पोस्टमन दादा आपल्यापर्यंत पत्रे कशी आणतात? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवता आली. पुस्तकातील माहितीपुरते मर्यादित न राहता, कृतीतून शिकण्याची संधी मिळाल्याने चिमुकल्यांनी या उपक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह सोमनाथ आकरीक आणि वरिष्ठ सहाय्यक समीर म्हात्रे यांनी या उपक्रमासाठी मार्गदर्शन केले, तर वरिष्ठ पोस्टमन मधुकर पाटील यांनी विद्यार्थ्यांना टपाल प्रक्रियेचे प्रात्यक्षिक दाखवून टपाल सेवेची माहिती सोप्या आणि रंजक पद्धतीने समजावून सांगितली.

वीजचोरीची प्रकरणे उघडकीस

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील उप अभियंता कार्यालयाच्या कक्षेत वीजचोरी होत असल्याचे सहाय्यक अभियंता यांच्याकडून कारवाई करण्यात आले आहे. महावितरणकडून ३२० वीज ग्राहक यांच्याकडे तपासणी केली असता २५ वीज ग्राहक यांच्याकडून वीजचोरी होत असल्याचे उघडकीस झाले आहे. दरम्यान, वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आल्याने वीज ग्राहक आनंदले आहेत.

महावितरणकडून वीजचोरी होऊ नये यासाठी अभियान राबवले जात आहे. त्या माध्यमातून भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रायगड जिल्हा अधीक्षक अभियंता बिक्कड आणि कार्यकारी अभियंता देशमुख यांच्या निर्देशानुसार नेरळ उपविभागात वीजचोरीविरोधात धडक मोहीम राबविण्यात येत आहे.



■ **नेरळ उपअभियंता कार्यालयाची कारवाई**

नेरळ उपअभियंता कार्यालयाच्या कक्षेत असलेल्या नेरळ एक आणि नेरळ दोन या ठिकाणी वीजचोरीबाबत मोहीम हाती घेण्यात आली आहे.

नेरळ उपविभागीय कार्यालयाचे उपअभियंता राख यांच्या नेतृत्वाखाली सहायक अभियंता दीक्षांत वाघ आणि वाघमारे यांच्या कार्यालयांनी महावितरण मधील वीज चोरीची माहिती घेण्यासाठी मोहीम राबविली. नेरळ-१ व नेरळ-२ विभागांत ३२० वीज जोडण्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये वीज अधिनियम २००३ च्या कलम १३५ अंतर्गत वीजचोरीची २५ प्रकरणे आढळून आली आहेत.

महावितरणच्या महावितरण वीजचोरी विरोधी पथकाने एकत्र येत वीजचोरी उघड केली. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ही कारवाई करताना वीजचोरी करणाऱ्या २५ वीज ग्राहक यांच्या विरुद्ध वीजचोरीच्या प्रकरणांमध्ये संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वीजचोरीला आळा घालण्यासाठी ही मोहीम यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे महावितरणकडून आवाहन करण्यात आले आहे.

लोखंडी रॉडने केली मारहाण

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

लोखंडी रोडने मारहाण केल्याप्रकरणी अब्दुल्ला आणि त्याचे दोन साथीदार यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात नऊ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद लोकमान तौहिद अहमद सिद्दिकी (रा. शिळफाटा) याने भाड्याने घेतलेल्या गाळ्यात आरोपींनी बेकायदेशीरपणे घुसून सामानाची तोडफोड केली.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.

मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची बिनशेती मिळकतीबाबत सौ. जयश्री पुंडलिक मोकल, रा. वैदेही बिल्डींग, दुसरा मजला, खोली क्र. ११, विद्यानगर, कृष्ण वाटीकेसमोर, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड सध्या रा. मु.पो. आमटेम, ता. पेण, जि. रायगड यांचेसोबत मिळकत खरेदी करण्याची बोलणी केलेली असुन सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रु. पै.)
पेण ग्रामीण	३८२/५ (बिनशेती)	४-५०-००	२८८.००

वरील वर्णनाची मिळकत व त्यातील दगड, धोंडा, पाणी, जाणे-येण्याचा मार्ग सर्व वहिवाटी, सर्व हक्क दरोबस्त अशी मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय असुन सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकत असे संबोधिले जाईल.

सदर बिनशेती मिळकत ही विद्यमान मालक यांचे ताबेकब्जा, वहीवाटीतील असुन ती निर्वेध, बारहीत विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहीवाट, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत, या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजीत व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. १२/१०/२०२६

ॲड. पुष्कर धनदास मोकल
रा. ईशान्य बिल्डींग, बी-विंग,
पहिला मजला, फ्लॅट नं. १०३,
महाजन हॉस्पिटलचे बाजुला, चिंचपाडा,
पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८५०३६११७२, ७७७००९८५३३

विधिता घरत नागावची पहिली महिला डॉक्टर

| उरण | प्रतिनिधी |

नागाव गावच्या सुकन्या विधिता मनीष घरत हिने वयाच्या अवघ्या २३व्या वर्षी डॉक्टर होण्याचा मान मिळवला असून, नागावची पहिली महिला डॉक्टर म्हणून तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे नागाव गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, ग्रामस्थांमध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण आहे.




नागावचे सुपुत्र आणि समिधा क्रिकेट क्लबचे मालक मनीष घरत यांची विधिता ही द्वितीय कन्या आहे. मनीष घरत यांनी क्रिकेट संघाचे मालक म्हणून नागावच्या क्रिकेट क्षेत्राला वेगळी ओळख मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे नागावच्या क्रिकेट क्षेत्राची ओळख रायगड जिल्ह्यात निर्माण झाली आहे. आता त्यांच्या कन्या विधिता हिने वैद्यकीय क्षेत्रात यश संपादन करून गावाच्या नावलौकिकात आणखी भर घातली आहे.

विधिताच्या या यशामुळे ती गावातील मुलींसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरली आहे. जिद्द, मेहनत आणि शिक्षणाच्या जोरावर मुलीही विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवू शकतात, हे तिने आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे. विधिता हिचे अभिनंदन करून तिला नागावचे अध्यक्ष वैभव यशवंत कडू यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

आज मुरुडमध्ये नाना पाटेकरांची शोकसभा

| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

मुरुडच्या भूमीत आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करून आपल्या कसदार अभिनयातून सर्वांचे लक्ष वेधून घेणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांची शोकसभा मुरुड तालुक्यातील तमाम जनतेच्या वतीने सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता दरबार हॉल येथे संपन्न होणार आहे. नाना पाटेकर यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी त्यांच्या कार्याची महती सांगण्यासाठी त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी विशेष करून खासदार सुनील तटकरे उपस्थित राहणार आहेत. मुरुडच्या मातीतील या भूमीपुत्राच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे, हीच या शोकसभेमागील भावना आहे. मुरुड तालुक्यातील तमाम नागरिक, नानाप्रेमी, कलाप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि सर्व मान्यवरांनी स्वर्गीय नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



महिलेला ६.२५ लाखांचा गंडा

| पनवेल | प्रतिनिधी |

लग्नाचे आमिष दाखवून महिलांचा विश्वास संपादन करत त्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीचा नवी मुंबई पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. मॅट्रिमोनियल संकेतस्थळाच्या माध्यमातून एका महिलेशी ओळख वाढवून तिची तब्बल ६ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नागेश अर्जुन पवार आणि त्याचा साथीदार आकाश मोहनलाल वर्मा यांना वाशी पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. तांत्रिक तपास आणि पोलिसांच्या विशेष सापळ्यामुळे या प्रकरणाचा उलगडा झाला. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेने 'जीवनसाथी डॉट कॉम' या विवाहविषयक संकेतस्थळावर लग्नासाठी आपले प्रोफाइल तयार केले होते. याच माध्यमातून मुख्य आरोपी नागेश पवार याने तिच्याशी संपर्क साधला. ओळख वाढवत आणि विश्वास संपादन करत त्याने महिलेला आर्थिक व्यवहारांच्या जाळ्यात ओढले. आरोपीने गाडी खराब झाल्याचे कारण पुढे करून सुरुवातीला महिलेकडून ६६ हजार रुपये घेतले. त्यानंतर वेगवेगळी कारणे सांगून तिच्याकडून आणखी पैसे उकळल्याचा आरोप आहे. अशा प्रकारे एकूण ६ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे तपासात समोर आले. याप्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशील अभिजीत विठोबा म्हात्रे व इतर यांनी दिलेल्या माहिती वरून तमाम जनतेस कळविण्यात येते की,

मौज महलमिरा डोंगर येथील, सर्व्हे नं. ३३२ आणि ३६८ अशा वर्णनाच्या जमिन मिळकती बाबत जमिन मिळकतीचे मालक अनुज अजय देसाई यांनी मध्यस्ती व्यक्ति संतोष काशिनाथ वाघ यांच्या मार्फत आमच्या अशील (अभिजीत म्हात्रे, अविनाश म्हात्रे व तुकाराम नाईक) बरोबर मिळकत विकत घेण्याबाबत व्यवहार करण्यात आलेला होता. परंतु, काही वैयक्तिक व आर्थिक कारणास्तव सदर जमिन मिळकतीचे मालक अनुज अजय देसाई यांच्याबरोबर झालेला सदरचा व्यवहार आमचे अशिलांनी दिनांक ०५/०५/२०२६ रोजी पुर्णतः रद्द केलेला आहे. तसेच सदर व्यवहाराकरिता देण्यात आलेली बयाणा रक्कम देखील दिनांक २०/०६/२०२६ रोजी परत करण्यात आलेली आहे. सबब, दिनांक २०/०६/२०२६ रोजी पासून आमचे अशिल (अभिजीत म्हात्रे, अविनाश म्हात्रे व तुकाराम नाईक) व मिळकतीचे मालक अनुज अजय देसाई यांचा सदर मिळकतीशी अगर मिळकतीच्या व्यवहाराशी काही एक संबंध राहिलेला नाही. आमचे अशील (अभिजीत म्हात्रे, अविनाश म्हात्रे व तुकाराम नाईक) यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही तिऱ्हाईत इसमाने/व्यक्तिने सदर मिळकती बाबत मिळकतीचे मालक अनुज अजय देसाई यांच्यासोबत व्यवहार अगर त्यात कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अनुज अजय देसाई व मध्यस्ती व्यक्तिची असणार आहे, त्यास आमचे अशील (अभिजीत म्हात्रे, अविनाश म्हात्रे व तुकाराम नाईक) जबाबदार राहणार नाहीत.

वर नमूद केलेल्या मिळकती करिता कोणत्याही इसमाने अगर संस्थेने कोणत्याही प्रकारचा कायदेशीर वारस, गहाण, दान, बक्षीस, न्यायालयाची, जप्ती, वहिवाट, भाडेपट्टा, वहिवाट ताबे कब्जा व साठेकरार, खरेदीखत, कुलअखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचे दस्त अगर कोणत्याही प्रकारचे व्यवहार केल्यास आमच्या अशिलांची कोणतीही हरकत राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण/दिनांक

ॲड. विधिती जयेश म्हात्रे.
दुर्वांकूर, चिंचपाडा, ता. पेण,
जिल्हा रायगड.
मोबाईल : ८७९३७५५१०५

जाहीर नोटिस

माझ्या आशिलाचे वतीने जाहीर नोटिस देण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मिळकती माझे आशीलांनी विकत घेण्याचे ठरविले असून ते त्यांचा मालकी हक्काची तपासणी करीत आहेत.

मौजे माणगाव तर्फे वरेडी (५५३५५३), ता. कर्जत, जि. रायगड, येथील भोगवटादार वर्ग-१ या शेतजमीन मिळकती:-

भूमापन क्र./ हिस्सा क्र.	क्षेत्र (हे.आर.चौ.मी)	आकारणी	पी.यू.आय.डी/ खाते क्र.
११९/५	०.१६.५०	रु १.३८	११५८४२९६५१६ /खाते क्र. ६८
१२०/४/ब	०.१५.८०	रु १.८१	१३२४६१३१८५२ /खाते क्र. ६८

एकूण क्षेत्र ० हे. ३२ आर. ३० चौ. मी (अंदाजे ३२ गुंठे). सदर मिळकती पूर्वीच्या महसुली अभिलेखात भूमापन क्र. १३४/५ व १३५/४/ब आशा नोंदी होत्या.

विक्री करणाऱ्या व्यक्ती या सदर मिळकतींचे नोंदीव भोगवटादार तसेच कै. श्री. गंगाराम कृष्ण दाभणे, व कै. जयराम गंगाराम देशमुख यांचे वारस या नात्याने हक्कादार असल्याचा दावा करतात. त्यांची नावे : श्री. नंदकुमार गंगाराम दाभणे, श्री गोपीनाथ गंगाराम दाभणे, श्रीमती. रतन शांताराम चौधरी, श्रीमती. शोभा दशरथ देशमुख, श्री. दिनेश दशरथ देशमुख, श्रीमती. अरुणा भगवान शिंदे, श्रीमती लता जयराम देशमुख, श्रीमती. प्रियंका रुपेश देशमुख, श्री. राहुल जयराम देशमुख, श्री. विवेक जयराम देशमुख, सर्व ता. कर्जत जि. रायगड. पूर्वीच्या नोंदीमध्ये श्री. जयवंत गंगाराम दाभणे व फेरफार क्र. २४१५ मध्ये श्री. जयराम गंगाराम देशमुख, अशी नोंद असलेली व्यक्ति एकच असल्याचा करण्यात आला आहे.

सदर मिळकतींमध्ये अथवा त्यांच्या कोणत्याही भागामध्ये वारसा, वारसहक्क, वाटणी, कौटुंबिक व्यवस्था, मृत्यूपत्र, बक्षीस, विक्री, करार, बयाणा, गहाण, बोजा, लीन, कुळ, संरक्षित कुळ, परवाना, वहिवाट, ताबा, जप्ती, हुकूमनामा, कुलमुखत्यारपत्र, विकसन हक्क, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार हितसंबंध, हिस्सा, दावा, व मागणी असल्यास त्याने तो पुराव्याच्या कागदपत्रांसह लेखी स्वरूपात, या नोटीशीच्या दिनांक पासून ७ (सात) दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीदार यांच्या पत्यावर कळवावी.

सदर मुदतीत कोणताही दावा न आल्यास तो सोडून दिला व त्याग केला असे समजण्यात येईल व माझे अशिल मालकी हक्क निर्वेध व निर्दोष समजून, आशा दाव्याचा विचार न करता, खरेदी पूर्ण करतील.

दिनांक १२.१०.२०२६ सही/-

अधिवक्ता आविष्कार अरुण अभंगे
मोबाईल नं. ८०८७३४९०१८
पत्ता - नेमिनाथ हाइट्स, मुद्रे बुद्रुक कर्जत, रायगड

IIFL FINANCE

आयआयएफएल फायनान्स लिमिटेड CIN: L67100MH1995PLC093797
नोंदणीकृत कार्यालय: आयआयएफएल हाऊस, सन इन्फोटेक पार्क, रोड क्र. 16व्ही, प्लॉट क्र. बी-23, ठाणे औद्योगिक क्षेत्र, वागळे इस्टेट, ठाणे – 400604 दूरध्वनी: 022-41035000 • फॅक्स: 022-25806654
टोल-फ्री: 1860-267- 3000 ई-मेल: gold-helpline@iifl.com • वेबसाइट: www.iifl.com

सार्वजनिक सूचना – तारण ठेवलेल्या सोन्याच्या मालमत्तेचा लिलाव

याद्वारे संबंधित कर्जदार/कर्जदारांना, त्यांच्या कायदेशीर वारसांना तसेच सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, एक भारतीय रिझर्व्ह बँकेत नोंदणीकृत बिगर-बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी), आयआयएफएल फायनान्स लिमिटेड ("आयआयएफएल") येथे नमूद केलेल्या कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या तारणमालमत्तेचा सार्वजनिक लिलाव आयोजित करीत आहे. संबंधित कर्जदारांनी लिलावाच्या सूचना व उपलब्ध पत्रव्यवहार माध्यमांद्वारे पाठविण्यात आलेल्या स्मरणपत्रांनंतरही आपल्या कर्जाची परतफेड किंवा खाते नियमित केलेले नसल्यामुळे, भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या लागू निर्देशांनुसार ("आरबीआय निर्देश"), कर्ज करारातील अटी व शर्ती तसेच आयआयएफएलच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सुवर्ण कर्ज (गोल्ड लोन) धोरणानुसार हा लिलाव करण्यात येणार आहे.

लिलावाची तारीख, वेळ आणि ठिकाण: सार्वजनिक लिलाव दि. **२०.१०.२०२६** रोजी **सकाळी १०:०० वाजल्यापासून** पुढे नमूद आयआयएफएल शाखेत आयोजित करण्यात येईल – **मुंबई एन एम – पनवेल उरण नाका – आयआयएफएल फायनान्स लिमिटेड, तळमजला, क्राउन इम्पीरियल प्लाझा, पनवेल-उरण नाका सर्कल, मासे मार्केटजवळ, पनवेल-४१०२०६.**

हा लिलाव त्याच जिल्ह्यातील कर्ज वितरण करणाऱ्या शाखांच्या कर्ज खात्यांशी संबंधित आहे.

